दैनिक


# सिंहवाणी वृत्त

Reg. No : MHBIL/25/A4140

प्रखर लेखणीचा साक्षीदार

- पृष्ठे : ४
- वर्ष : १
- अंक : १६७
- किंमत : २ रूपये

Mail Id : sinhvanivrutta@gmail.com    Epaper : epaper.sinhvani.com    दिनांक : बुधवार, २७ मे २०२६

# 'सेवश्री'

## सकल जणांचा उद्धारू

मुखपृष्ठ © कल्पेश पागरुत

दैनिक सिंहवाणी वृत्त
'सेवश्री'
सकल जणांचा उद्धारू
Mail Id : sinhvanivrutta@gmail.com
Epaper : epaper.sinhvani.com
२ दिनांक : बुधवार, २७ मे २०२६

# सांस्कृतिक लाड पुरवणारे खासदार !

लेखक



**निकिता गजानन गावंडे**
नागपूर

आटपाट नगर होतं. नगर तसं मोठंच. पूर्व पश्चिम उत्तर दक्षिण असं विभागलेलं. नगरातील लोक होते खाऊन पिऊन सुखी. नगरात एक पूल होता. शहराबरोबरच लोकांनाही विभागणारा. पुलाच्या पलीकडले म्हणे पुढारलेले आणि अलीकडले मात्र सांस्कृतिक दृष्ट्या मागासलेले. त्यांना काय कळणार नृत्य नाटक संगीत. म्हणून त्याचा मक्ता होता पूलापलीकडल्या लोकांकडे. ते छान पैकी नाटक नृत्य संगीताचे कार्यक्रम बघायला जायचे. त्यावर चर्चा करायचे आणि अलीकडले मात्र त्यांच्या तोंडाकडे बघत राहायचे बिचारे ! मग काय झालं त्यांना मिळाला एक जाणता खासदार. अस्सल नागपुरी मातीतला. लोकांच्या भावना समजणारा. पोटाच्या भुकेनंतर मनाची, डोक्याचीही एक भूक असतेच हे समजून घेणारा. त्यांने लोकांसाठी त्यांच्याच भागात छान छान गाण्यांचे, भजनांचे नृत्याचे कार्यक्रम आयोजित करायला सुरुवात केली. लोकांनीही त्याचीही कल्पना अक्षरशः डोक्यावर घेतली आणि त्यातून जन्माला आला एक असा महोत्सव जो त्या शहराची ओळख बनला.

मंडळी ! एव्हाना आपल्या लक्षात आलंच असेल की आपण आपल्या नागपूर नगरीची ओळख असलेल्या खासदार सांस्कृतिक महोत्सवा विषयी बोलत आहोत. २०१७ साली आपले लाडके खासदार मा. नितीनजी गडकरी यांच्या संकल्पनेतून हा महोत्सव जन्माला आला आणि दरवर्षी कलेकलेनं वाढत गेला. सुखविंदर सिंग, श्रेया घोषाल, कंगना रणौत, हेमा मालिनी, कुमार विश्वास अशा अनेक नामवंत कलाकारांचे पाय यानिमित्ताने संत्रा नगरीला लागले. यांच्या बद्दल खूप ऐकलं, वाचलं पडद्यावर पाहिलं पण प्रत्यक्ष पाहण्याचं भाग्य मात्र लाभलं नाही अशा अनेक दिग्गजांना याची देही याची डोळा पाहण्याचा भाग्य आम्हा नागपूरकरांना लाभलं ते केवळ आणि केवळ नितीनजींमुळे. शहराची नाडी खऱ्या अर्थाने या अगोदर कुणालाच कळली नव्हती.



खासदार महोत्सव ही माननीय नितीनजींच्या सुपीक डोक्यातील कल्पना. अशा प्रकारचा महोत्सव आयोजित करणारे नागपूर हे देशातील पहिले शहर. केवळ खासदार सांस्कृतिक महोत्सवच नाही तर खासदार क्रीडा महोत्सव, खासदार जेष्ठ नागरिक महोत्सव असे अनेक कार्यक्रम सातत्याने आयोजित होतात. ईश्वर देशमुख क्रीडा आणि शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या भव्यपटांगणात या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन होते. आता तर शहराच्या अनेक भागांमध्ये ही या आयोजनांना सुरुवात झाली आहे. या कार्यक्रमाने शहराला खऱ्या अर्थाने सांस्कृतिक दृष्ट्या श्रीमंत केले आहे. शास्त्रीय गायनाचे एखादी मैफल किंवा एखादे कवी संमेलन प्रत्यक्ष बघणे या स्वप्नातच अनेकांचे केस काळ्याचे पांढरे झाले. या आयोजनाने अनेकांना या स्वप्नपूर्तीचा आनंद लाभला तो केवळ आणि केवळ त्यांच्या लाडक्या खासदारामुळे. एवढेच काय तर या कार्यक्रमाच्या एक तासा अगोदर स्थानिक कलावंतांचे कार्यक्रम असतात. त्यात नागपूरातीलअनेक शाळांमधून निवड करण्यात आलेले बालकलाकारही असतात.




आज हा कार्यक्रम लोकप्रियतेच्या शिखरावर आहे. एखाद्या कार्यक्रमातील गर्दी आवरण्यासाठी पोलीस बंदोबस्त करावा लागतो यापेक्षा दुसरे त्या कार्यक्रमाचे यश ते काय? डिसेंबर महिन्यातील कडाक्याची थंडी पण तिलाही न जुमानता उघड्या मैदानातील कार्यक्रमाचा आस्वाद घेणारे रसिक जन. त्यात आघाडीवर आपल्या परिवारासहित असलेले स्वतः खासदार महोदय. एखाद्या शहरातील कौटुंबिक ऐक्याचं दुसरं उदाहरण काय द्यावं?


आज नितीनजींचे ख्याती आहे ती त्यांनी बांधलेल्या महामार्गांमुळे. देशाच्या कानाकोपऱ्यात असलेल्या गावांना जोडण्याचे काम त्यांनी केलेले आहेच पण रफ टफ अशी ओळख असलेल्या नागपूरातील जनतेच्या मनात शिरण्याचा राजमार्ग मात्र त्यांना नक्कीच गवसलेला आहे. आज आमच्या या लाडक्या खासदार महोदयांचा वाढदिवस यानिमित्ताने त्यांना उदंड आयुष्य लाभावे अशी परमेश्वर चरणी प्रार्थना.

जीवेत् शरदः शतम्।

- ९९७०६६३८१३

# 'गडकरींची दूरदृष्टी : आधुनिक भारताचा पायाभूत विकास'

लेखक



**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल**
वर्धा

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे भारतीय राजकारणातील एक 'अजातशत्रू' व्यक्तिमत्त्व मानले जातात. याचा अर्थ असा की, ज्यांचा राजकीय कारकिर्दीत कोणीही शत्रू नाही. सर्वपक्षीय नेत्यांशी त्यांचे सलोख्याचे संबंध आहेत आणि विरोधकही त्यांच्या कामाचे आणि विकासाच्या दृष्टिकोनाचे नेहमीच कौतुक करतात.

गडकरी साहेबांची कार्यशैली अशी आहे की, केवळ सत्ताधारीच नव्हे तर विरोधी पक्षांतील नेतेही त्यांचा आदर करतात. सुप्रिया सुळे आणि नाना पाटेकर यांच्यासारख्या दिग्गजांनी अनेकदा जाहीरपणे त्यांना राजकारणातील 'अजातशत्रू' म्हणून संबोधले आहे. एवढेच नव्हे तर त्यांच्या दूरदृष्टीमुळे आणि धडाकेबाज कार्यशैलीमुळे देशातील रस्ते जाळ्याचा झपाट्याने विकास झाला असून 'रोडकरी' आणि 'भारताचे इन्फ्रास्ट्रक्चर मॅन' म्हणून त्यांची ख्याती आहे.

गडकरी हे भारताचे 'हायवे मॅन' म्हणूनही त्यांना ओळखले जाते. द्रुतगती महामार्ग, आधुनिक उड्डाणपूल आणि मेट्रो प्रकल्पांच्या अभूतपूर्व जाळ्यामुळे ते खऱ्या अर्थाने 'विकासपुरुष' ठरले आहेत.

दररोज अनेक किलोमीटर महामार्ग तयार करण्याचा वेग त्यांनी साध्य केला आहे. प्रलंबित प्रकल्पांना गती देऊन त्यांनी रस्ते विकासाची नवी क्रांती घडवूनआणलीआहे. देशात जागतिक दर्जाचे एक्सप्रेसवे (उदा. दिल्ली-मुंबई एक्सप्रेसवे) आणि दुर्गम भागात बोगदे उभारून प्रवासाचा वेळ आणि अंतर मोठ्या प्रमाणात कमी केलेले आहेत ते हरित ऊर्जा इथेनॉल, आणि इलेक्ट्रिक वाहनांचे खंदे पुरस्कर्ते आहेत? बांधकाम क्षेत्रात पयार्यी इंधन आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ते प्रदूषण मुक्तीसाठी सतत प्रयत्नशील आहेत. महामार्गांवर प्रवाशांच्या सुरक्षेसाठी आणि सोयीसाठी हेलिपॅड, ट्रॉमा केअर सेंटर्स आणि अत्याधुनिक सुविधांची निर्मिती केली जात आहे? केवळ राष्ट्रीय महामार्गच नव्हे, तर महाराष्ट्रासह देशभरातील शहरी आणि ग्रामीण भागातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी ते ५० हजार कोटींपर्यंतचे प्रकल्प राबवत आहेत? देशाच्या प्रगतीसाठी आणि आधुनिक भारताच्या उभारणीसाठी ते नवनवीन इंजिनिअरिंग तंत्रज्ञान आणि धोरणांचा सातत्याने पुरस्कार करत आहेत.

गडकरी साहेबांची यांची दूरदृष्टी म्हणजे आधुनिक भारताच्या पायाभूत विकासाचा मुख्य पाया आहे. त्यांच्या नाविन्यपूर्ण नियोजनामुळे जागतिक दर्जाचे रस्ते, एक्सप्रेसवे आणि शाश्वत वाहतूक व्यवस्थेची निर्मिती होत असून, भारत 'विकसित राष्ट्र' बनण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल करत आहे.केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी देशभरात केलेल्या जागतिक दर्जाच्या महामार्ग आणि रस्ते जाळ्याच्या विकासामुळे 'पायाभूत विकास' हीच त्यांची मुख्य ओळख बनली आहे. राजकारणापलीकडे जाऊन देशाच्या पायाभूत सुविधा, रस्ते जाळे, आणि ग्रीन हायड्रोजन व इथेनॉल यांसारख्या पर्यायी इंधनांच्या विकासावर त्यांचा अधिक भर असतो. गडकरी यांच्या नेतृत्वाखाली भारतात महामार्गांचे प्रचंड जाळे निर्माण झाले आहे. त्यांनी एक्सप्रेसवे, ग्रीनफिल्ड कॉरिडोअर आणि अत्याधुनिक उड्डाणपुलांच्या माध्यमातून प्रवासाची वेळ आणि इंधनाची मोठी बचत केली आहे. देशाच्या एकात्मिक आणि सर्वसमावेशक विकासासाठी ते 'गतिशक्ती राष्ट्रीय मास्टर प्लॅन' अंतर्गत लॉजिस्टिक खर्च कमी करून भारतीय उत्पादनांना जागतिक पातळीवर स्पर्धात्मक बनवत आहेत. रस्ते जोडणीसोबतच ते ग्रामीण भागातील रस्ते विकासालाही सर्वोच्च प्राधान्य देतात. विकासपायाभूत सुविधा या नेहमी 'लोककेंद्रित' असल्या पाहिजेत, असा त्यांचा नेहमी आग्रह असतो. नागरिकांचा आराम आणि प्रवासाची सोय सुनिश्चित करण्यासाठी त्यांनी महामार्गांलगत शेकडो प्रवासी सुविधा विकसित केल्या आहेत.

दर्जेदार पायाभूत सुविधा या केवळ दळणवळणाचे साधन नसून, त्यातून देशात मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होते आणि ५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे स्वप्न साकार होण्यास मदत होते. या विकासाबाबत अधिकृत माहिती आणि घोषणा पाहण्यासाठी आपण केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय किंवा अधिकृत भारतीय जनता पक्ष संकेतस्थळाला भेट देऊ शकता.महाराष्ट्राच्या विदर्भ विभागात, विशेषतः वर्धा आणि आजूबाजूच्या परिसराच्या विकासात त्यांचे योगदान अतुलनीय आहे. अशाच एका रस्ते प्रकल्पाच्या माध्यमातून पूर्व विदर्भातील वाहतूक अधिक सुरक्षित आणि सुलभ झाली आहे, भंडारा बायपास आणि मौदा उड्डाणपुलामुळे पूर्व विदभार्तील दळणवळणात कसा आमूलाग्र बदल झाला आहे.




विशेष म्हणजे नागपूरमधील कामठी रोडवरील ५.६२ किमीचा डबल डेकर व्हायाडक्ट (ज्याच्या पहिल्या टप्प्यावर महामार्ग, दुसऱ्या टप्प्यावर मेट्रो आणि जमिनीवर रस्ता आहे) जागतिक विक्रमाचा मानकरी ठरला आहे. झिरो माईल आणि सीताबर्डी स्थानकांचे नियोजनबद्ध बांधकाम करून त्यांनी नागपूरच्या सार्वजनिक वाहतुकीला जागतिक दर्जा मिळवून दिला आहे. गडकरी यांच्या संकल्पनेतून नागपूर ते गोंदिया दरम्यान देशातील पहिली ब्रॉडगेज मेट्रो धावणार आहे. ही मेट्रो नागपूरला अमरावती, यवतमाळ, आणि छिंदवाडा सारख्या लगतच्या शहरांशी जोडेल. महाराष्ट्राच्या विदर्भ विभागात, विशेषतः वर्धा आणि नागपूर परिसरात त्यांनी पायाभूत सुविधांचे प्रचंड जाळे विणले आहे. यामुळे उद्योग, शेतीमाल वाहतूक आणि रोजगाराच्या नवनवीन संधी निर्माण झाल्या आहेत. गडकरींनी पदभार स्वीकारल्यापासून महामार्ग बांधकामाचा वेग प्रतिदिन १२ किलोमीटरवरून तब्बल ४० किलोमीटरपर्यंत वाढवला आहे. भारतमाला आणि सागरमाला सारख्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांमुळे देशातील औद्योगिक आणि आर्थिक कॉरिडोअर एकमेकांना जोडले गेले आहेत. मुंबई-पुणे एक्सप्रेसवे हा त्यांच्याच दूरदृष्टीचा एक उत्कृष्ट आविष्कार आहे, ज्याला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत आता 'मिसिंग लिंक'सारखे प्रकल्प साकारले आहेत. लॉजिस्टिक खर्च कमी करण्यासाठी आणि वाहतुकीचे जाळे बळकट करण्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील आहेत. शाश्वत आणि पर्यावरणपूरक तंत्रज्ञानः सिमेंट रस्त्यांच्या निर्मितीमुळे त्यांनी देशाला खड्डेमुक्त रस्त्यांची भेट दिली आहे. याशिवाय, प्रदूषणमुक्तीसाठी हायड्रोजन, इथेनॉल आणि जैवइंधना सारख्या पर्यायी ऊर्जा स्त्रोतांचा वापर वाढवण्यावर त्यांचा विशेष भर आहे.रस्ते अपघातातील पीडितांना वेळेवर वैद्यकीय मदत मिळावी यासाठी त्यांनी 'कॅशलेस उपचार' योजनेची महत्त्वपूर्ण घोषणा केली आहे. नितीन गडकरी यांच्या या पायाभूत क्रांतीमुळे देशाला जागतिक स्तरावर एक नवीन ओळख मिळाली असून, समृद्ध भारताचा पाया रचला गेला आहे.

ते आपल्या स्पष्टवक्तेपणासाठी आणि भ्रष्टाचारावर किंवा सरकारी धोरणांवर परखड मते मांडण्यासाठी ओळखले जातात. अनेकदा ते पक्षाच्या चौकटीबाहेर जाऊन किंवा स्वतःच्याच सरकारच्या धोरणांवर अत्यंत अभ्यासपूर्ण आणि स्पष्ट शब्दांत टीका अथवा सूचना करताना दिसतात.

राजकारणापेक्षा पायाभूत सुविधा आणि विकासाला अधिक महत्त्व देतात. त्यांनी अनेकदा राजकीय नेत्यांना आणि अधिकाऱ्यांना 'कामात दिरंगाई चालणार नाही' असा सज्जड दम दिला आहे. भ्रष्टाचाराच्या मुद्यावर त्यांनी अनेकदा जाहीरपणे नाराजी व्यक्त केली आहे आणि पारदर्शक कारभाराचा आग्रह धरला आहे. त्यांच्या परखड स्वभावामुळे ते विरोधकांच्याही आदरास पात्र ठरले आहेत. अनेकदा ते विरोधी पक्षातील चांगल्या कामांचे कौतुक करण्यास मागेपुढे पाहत नाहीत.

- ९५६१५९४३०६








सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)



# गडकरींची 'तप'पूर्ती !


लेखक



विनोद देशमुख
नागपूर


"झाले बहु, होतील बहु, परंतु या सम हाचि हा..." ही मोरोपंतांची आर्या तंतोतंत लागू पडणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे आपले नितीन गडकरी. हो तेच. भारत सरकारचे रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री म्हणून गेली सलग १२ वर्षे (एक तप) कार्यरत अन् देशभर गाजत असलेले गडकरी. कामांचा फटाफट निपटारा करण्याच्या शैलीतून देशाच्या रस्ते वाहतुकीचा चेहरामोहराच बदलवून टाकणारे गडकरी. रोडकरी, पूलकरी, Road Roller, Transport Man of India अशा विविध उपाध्या लोकांकडून उत्स्फूर्तपणे पदरात पडलेले गडकरी. फक्त रस्ते-पूलच नव्हे, तर वाहनांचं इंधन, शेती, संस्कृती, क्रीडा याही क्षेत्रांची काळजी घेण्यासाठी विविध उपक्रम हाती घेणारे गडकरी. इतके विविधांगी आयाम असलेले, पंतप्रधान नरेन्द्र मोदी यांच्या सरकारमधील एकमेव मंत्री गडकरी. लागोपाठ तिर्सऱ्यांदा नागपूरचे खासदार (आणि केन्द्रात मंत्रीही) बनून 'डबल हॅटट्रिक' करणारे नितीन गडकरी.

केंद्रीय मंत्री म्हणून गेल्या बारा वर्षात गडकरींनी केलेली कामे डोळ्याखालून घातली तरी त्यांच्या धडाकेबाज शैलीची कोणालाही कल्पना येते. बंगालमधील हावडा रेल्वे स्थानकावरील रामलखन या बिहारी हमालाला सुद्धा गडकरी माहीत आहेत. वर तो म्हणतो- "गडकरीजी को देशमें कौन नही जानता!" आसामच्या ग्रामीण भागातील चहा टपरीवाला सैकिया कसाबसा हिंदीत सांगतो- "गडकरीजी ने रास्ता अच्छा बनाया, इसलिए लोगोंका आनाजाना बढा और हमारा धंदा-इन्कम भी बढ गया है।" काश्मीरमधील सुलेमान सुद्धा रस्त्याचा लाभार्थी असल्यामुळे गडकरींना दुवा देतो. गडकरींची प्रतिमा "कामके आदमी" अशी देशभर झाली असल्याची साक्ष अशी शेकडो-हजारो उदाहरणं देत आहेत. इतकं काम १२ वर्षात गडकरींच्या खात्यावर जमा झालं आहे.



## कार्यक्षमतेत तिप्पट वाढ

महामार्गांचंच पाहा. २०१४ ते २०२५ या ११ वर्षांमध्ये नियोजित १ लाख ४६ हजार २०४ कि. मी. महामार्गांपैकी १ लाख ६ हजार ७४६ कि. मी. बांधून पूर्ण (७३ टक्के) झाले, तर उर्वरित काम वेगवेगळ्या टप्प्यांवर प्रगतिपथावर आहे. वर्षाला १० हजारावर कि. मी.? आणि दररोज ३० कि. मी. पेक्षा जास्त लांबीच्या रस्त्याची उभारणी. मोदी सरकारच्या आधी २०१४ पर्यंत हाच दर १० कि. मी. च्या आत होता! यावरून गडकरींच्या कामाचा वेग कोणाच्याही लक्षात यावा. म्हणूनच काही लोक त्यांना "Highway Man" म्हणायला लागले. पैशात मोजायचं तर १५ लाख कोटी रुपयांच्या योजना पूर्ण झाल्या (यात अगणित पूल, उड्डाणपूल, बोगदे आलेच) आणि बाराव्या वर्षासाठी (२०२५-२६) तरतूद होती २ लाख ८७ हजार कोटी. भविष्यातील १५ लाख कोटींच्या योजनाही आखून आजच तयार. यातील सव्वा लाख कोटी खर्चाच्या ३ हजार कि. मी. लांबीच्या योजनांना नुकतीच अंतिम मंजुरीही देण्यात आली आहे. हे आहेत गडकरी !

## मुंबईत ५५ उड्डाणपूल

हे सारं ऐकून-वाचून लोकांना प्रश्न पडतो की, गडकरींना हे सारं जमतं कसं ? त्याचं उत्तर आहे- छोटीमोठी स्वप्नं पाहणं गडकरींना मान्यच नसतं. करायचं तर भव्यदिव्यच, हा त्यांचा नेहमीचा बाणा आहे. गेल्या तीन दशकातील १५-१६ वर्षे सत्तेत असताना त्यांनी भव्य स्वप्नं पाहिली आणि ती पूर्णत्वास नेऊन दाखवली. याला इतिहासच साक्षी आहे. सत्तेच्या पहिल्या काळातच (१९९५-९९) त्यांनी अशी काही कामगिरी बजावली की, त्यांचं नाव देशभर झालं. आणि गेल्या बारा वर्षात तर ते जगभर झालं आहे. रस्ते, पूल, उड्डाणपूल, बोगदे या कामांचं पयार्यी नाव आता "नितीन गडकरी" झालेलं आहे, इतका धडाका त्यांनी प्रारंभापासूनच लावला आणि वाढत्या वेगानं तो आज त्यांच्या ६९ व्या वर्षीही कायम आहे.

महाराष्ट्राच्या पहिल्या युती सरकारमध्ये सार्वजनिक बांधकाम मंत्री असताना त्यांनी साडेचार वर्षातच इतकी अफलातून कामगिरी करून दाखवली की, सर्वांचीच बोटं तोंडात गेली! मुंबई महानगरातील वाहतूक कोंडी फोडण्याचा जालिम उपाय म्हणून ५५ उड्डाणपूल एकामागून एक बांधण्याचा सपाटाच त्यांनी लावला आणि मुंबईच्या रस्ते वाहतुकीत होणारी कोंडी कमी केली. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्वप्नातील मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाचं नियोजन करून त्याचं काम नेहमीच्या धडाक्यात सुरूही केलं. फक्त ते त्यांच्या कारकीर्दीत पूर्ण होऊ शकलं नाही, एवढंच. तरीही या द्रुतगती मार्गाचे खरे शिल्पकार तेच ठरले. मुंबई-पुणे मार्गावरील वाहतुकीची समस्या मोठ्या प्रमाणावर सुटणं यामुळेच शक्य झालं.

## देशाला दाखवला 'मार्ग'

पहिल्याच मंत्रिपदाच्या काळात केलेल्या या भरभक्कम कामांची शिदोरी पाठीशी घेऊनच नितीनजी २०१४ मध्ये दिल्लीत दाखल झाले आणि गेली १२ वर्षे देशासाठी झपाटल्यासारखं काम करीत आहेत. एरवी विरोधी पक्षांचे नेते मंत्र्यांच्या कामगिरीचं कौतुक क्वचितच करताना दिसतात.? हा 'क्वचित' शब्द गडकरींनी 'वारंवार' मध्ये रूपांतरित करून दाखवला, इतकी त्यांची काम करण्याची पद्धत सर्वव्यापी आणि पक्षनिरपेक्ष आहे. काँग्रेसाध्यक्ष सोनिया गांधी यांनी त्यांच्या मतदारसंघातील रस्ते विकासाबद्दल लेखी आभार मानले, यापेक्षा मोठा पुरावा कोणता असू शकतो? "सबका साथ, सबका विकास" या पंतप्रधानांच्या घोषणेचं सर्वाधिक प्रत्यंतर आणून देण्याचं विलक्षण काम गडकरींनी निष्ठेनं केलं, हे वेगळं सांगण्याची गरजच नाही.

### गंगेतून चालवलं जहाज !

केंद्रीय मंत्रिपदाच्या पहिल्या कारकीर्दीत गडकरींकडे जहाज खाते ५ वर्षे आणि जलसंधारण, नदी विकास, गंगा स्वच्छता ही अतिरिक्त खातीही पावणेदोन वर्षे होती. तेथेही त्यांनी लक्षणीय काम करून दाखवलं. बंदर विकास आणि जहाज उभारणी यांना गती दिली. 'नमामि गंगे' ही गंगा शुद्धीकरण मोहीम जोरात राबवून गंगा स्वच्छ आणि जहाज वाहतुकीयोग्य केली. परिणामी कोलकात्यापासून वाराणसीपर्यंत जलपर्यटनाचा मार्ग मोकळा झाला. गंगेतून प्रवास करण्याचा आनंद अनुभवणं भाविकांना आणि पर्यटकांना यामुळे शक्य झालं. गंगेतून जहाज चालेल, हे अशक्य वाटणारं स्वप्न गडकरींनी अल्पावधीत प्रत्यक्षात उतरवून दाखवलं आहे.

रस्ते या विषयाव्यतिरिक्त इतरही क्षेत्रांमध्ये दमदार 'मार्ग'क्रमण करून त्यांनी मोलाचं योगदान दिलं आहे. रस्ते वाहतुकीतील मुख्य इंधन असलेल्या पेट्रोल-डिझेलमध्ये इथेनॉल मिसळण्याचं प्रमाण वाढविण्याचा मुद्दा असो की पेट्रोल-डिझेल वाहनांऐवजी वीजचालित वाहनांना? प्रोत्साहन देणं असो, मिळेल त्या प्रत्येक व्यासपीठावरून ते इथेनॉल, वीज यांचा प्रचार करीत असतात.

## खासदार म्हणूनही...

शेती, संस्कृती आणि क्रीडा हे तीन त्यांचे आधीपासूनचे आवडीचे विषय आहेत. नागपूर जिल्ह्यातील धापेवाडा या स्वतःच्या मूळ गावी त्यांचा भक्ती फार्म म्हणजे कृषी प्रयोगशाळाच आहे. तेथील एकेक किलो वजनाचा कांदा पाहून आपले डोळेच फिरतात ! कापूस, ऊस या नगदी पिकांच्या शेतकऱ्यांना मदत करण्यात ते सतत आघाडीवर असतात. त्यांच्या ॲग्रो व्हिजन प्रदर्शनाचा पसारा वर्षागणिक वाढतच आहे. शेतीच्या सिंचन योजना राबवणं. शेतकऱ्यांना प्रशिक्षित करणं असे प्रयोग ते सातत्यानं? करीत असतात.

प्रत्येक खासदारानं स्वतःच्या क्षेत्रात दरवर्षी सांस्कृतिक महोत्सव आणि क्रीडा महोत्सव भरवावे, अशी सूचना पंतप्रधान मोदीजींनी केली होती. ती अमलात आणणारे नितीन गडकरी हे देशातील एकमेव खासदार असावेत. प्रत्येक वर्षी वाढत्या प्रतिसादात होणारे हे दोन्ही महोत्सव नागपूरच्या सीमा ओलांडून देशभर प्रसिद्धी पावले आहेत. ख्यातनाम कलावंत आणि प्रख्यात खेळाडू यात हिरीरिनं भाग घेत आहेत. हजारो प्रेक्षक-श्रोते त्यांना लाभत आहेत.

एकूण, रस्त्यांपासून कृषीपर्यंत अनेक क्षेत्रांमध्ये नितीन गडकरी हे नाव गेली बारा वर्षे देशभर गाजत आहे. नेता दूरदृष्टीचा आणि कार्यसम्राट असेल तर 'तप'श्चर्येला फळ मिळतेच. असे विरळा कर्मयोगी विकासपुरुष आज २७ मे रोजी सत्तराव्या वर्षात? प्रवेश करीत आहेत. त्यांच्या कल्पक योजनांचा लाभ देशवासीयांना पुढेही मिळत राहण्यासाठी त्यांना दीर्घ आयुरारोग्य लाभो, या प्रार्थनेसह वाढदिवसाच्या लाख शुभेच्छा.


- ज्येष्ठ पत्रकार
९८५०५८७६२२


# आधुनिक युगाचे महामेरू "विकासपुरूष" नितीनजी गडकरी

आजच्या आधुनिक युगात देशात जे काही रस्त्यांचे जाळे व उड्डाणपूल दिसत आहे त्याचे संपूर्ण श्रेय केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांनाच जाते. रस्त्यामुळेच दळणवळणाचा मार्ग मोकळा होतो व विकासाची दिशा ठरत असते. नितीनजी गडकरी यांच्या बुध्दीमत्तेचा व दुरदृष्टीतेचा वापर अनेक देश करीत आहे.त्यामुळे विकासाच्या बाबतीत गडकरींचे नाव मोठ्या सन्मानाने व आदरतीथ्याने भारतासह संपूर्ण जगात घेतले जाते. आज जगात गडकरींचे नाव विकासपुरूष म्हणून मोठ्या आदराने आणि स्वाभिमानाने घेतले जाते. औद्योगिक आणि तांत्रिकदृष्टया सर्वगुण संपन्न असलेले बलाढ्य देश अमेरिका, चीन, रशिया, फ्रान्स, ऑस्ट्रेलिया यांना मागे टाकून महामार्गाच्या बाबतीत अव्वल स्थान मिळविने भारतासारख्या लोकशाही देशाकरीता अभिमानाची गोष्ट आहे. गडकरींनी आपले लक्ष पुर्ण करण्यासाठी संपूर्ण शक्तीनिशी महामार्गाच्या कामाकडे लक्ष केंद्रित केले. त्यामुळेच आज भारत महामार्गाच्या जाळ्याच्या बाबतीत जगात दुसऱ्या क्रमांकाचा देश बनला आहे.कारण गडकरींना ग्यात होते की महामार्गाशिवाय देशाचा इतर बाबतीत सुद्धा विकास संभव नाही. त्यामुळे गडकरींनी जेव्हा राजकारणात पाऊल टाकले तेव्हा पाहूनच त्यांच्या मनात विकासाचे कालचक्र फिरत असावे.

गडकरींनी विकासाची सुरूवात महाराष्ट्र सरकारमध्ये मंत्री असतांना पासून सुरू केली. यानंतर विकासाच्या बाबतीत मागे वळून कधीच पहाले नाही. २०१४ मध्ये नितीनजी गडकरी केंद्रीय मंत्री बनले तेव्हा पासून


लेखक



रमेश लांजेवार
नागपूर


आजपर्यंत देशात हजारो किलोमीटरचे अत्याधुनिक पध्दतीने महामार्ग बनवून १४० कोटी जनतेला होणारा त्रास दुर झाला, त्याचबरोबर दळणवळण, आरोग्य सेवा, व्यापारी वाहतूकीला व सुरक्षेच्या दृष्टिकोनातून मोठ्या प्रमाणात चालना मिळाली सोबतच गावागावात रोड बनवून गावतीथे सिमेंट रोड हि संकल्पना साकार होतांना दिसत आहे. त्याच पध्दतीने ७०१ किलोमीटरचा नागपूर- मुंबई समृद्धी महामार्ग बनवून विकासाचा नवीन इतिहास घडविला. यामुळे हजारो लोकांना रोजगार सुध्दा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला. देशातील नवीन महामार्गामुळे हजारो किलोमीटरची वाहातुक सर्वांसाठी सुलभ झाल्याचे दिसून येते. यामुळे अनेक बाजारपेठांशी ताबडतोब संपर्क साधता येतो.

गडकरींची कला अवगत करण्यासाठी विदेशातील अनेक एक्स्पर्ट व तज्ञ त्यांच्याशी सल्ला-मसलत करण्यासाठी भारतात येतात. त्यामुळेच आज जगात विकासाच्या बाबतीत गडकरींचे नाव मोठ्या सन्मानाने घेतले जाते. महाराष्ट्राच्या बाबतीत विचार केला तर महाराष्ट्राचा विकास सुवर्ण अक्षरांनी लिहावा या पध्दतीने गडकरींनी कार्य केल्याचे दिसून येते.आज नागपूरात आपल्याला मेट्रो धावतांना दिसत आहे. त्याचे संपूर्ण श्रेय माननीय गडकरींना जाते. मेट्रोमुळे लोकांपुढील वाहतुकीची कोंडी तुटली व मोठी सुविधा झाली. त्याचबरोबर अनेक बेरोजगारांना रोजगार देण्याचा मार्ग सुलभ केला. संपुर्ण महाराष्ट्रात उड्डानपुल व सिमेंट रोडमुळे महाराष्ट्राची संपूर्ण कायापालट झाल्याचे दिसून येते. जी-२० च्या अनुषंगाने भारताचे केंद्रबिंदु असलेले नागपूर झगमगत होते यात गडकरींचा सिंहांचा वाटा आहे. यावरून स्पष्ट होते की महाराष्ट्रासह देशाला खरा विकासाचा मार्ग दाखविला असेल तर नितीनजी गडकरी यांनी त्यामुळेच त्यांना आज संपूर्ण देश सन्मानाने व आदराने सलाम करतो.

राज्याच्या विकाससोबत देशाचा विकास सुरू असतांनाच राज्याची व देशाच्या संस्कृतीचे जतन करण्याची धुराही सांभाळण्याचे काम गडकरींनी केले. नागपूरमध्ये खासदार महोत्सवाची सुरुवात २०१८ पासून झाली. त्यानिमित्याने दरवर्षी नागपूरात खासदार महोत्सव साजरा केल्या जातो. यात विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. यात मुख्यत्वे करून महाराष्ट्रासह भारतीय संस्कृतीचा वारसा पथनाट्याच्या व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचवील्या जाते. या कार्यक्रमात मुख्यत्वेकरून संपूर्ण धमार्ची जोपासना आपण कशी टीकवायची याचेही हुबेहूब चित्रिकरण पहायला मिळते.यामुळे महाराष्ट्राचा वारसा दिसून येतो.



नव्या पिढीला आपल्या संस्कृतीची चालना देण्याचे काम माननीय श्री नितीनजी गडकरी यांनी खासदार महोत्सवाच्या निमित्ताने आतापर्यंत दाखविले आहे. पुढेही आपली संस्कृती टिकून राहावी या उद्देशाने दरवर्षी आपल्याला खासदार महोत्सवात पहायला मिळतो आणि खेळाडूंमध्ये नवीन ऊर्जा निर्माण व्हावी या उद्देशाने खासदार क्रीडा महोत्सव दरवर्षी घेण्यात येतो. याचे संपूर्ण श्रेय गडकरींना जाते. सध्याच्या परिस्थितीत भारतातील अनेक राज्यांमध्ये सांस्कृतिक वारसा लुप्त होतांना दिसत आहे. परंतु विदर्भासह महाराष्ट्राला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा सारखा पूत्र मिळाल्याने खासदार महोत्सवाच्या निमित्ताने सांस्कृतिक वारसा जिवित झाल्याचे दिसून येते. आज गडकरींच्या पुंण्याईने नागपूरसह संपूर्ण भारतात उड्डाण पुले व महामार्ग पहायला मिळते. त्यामुळेच त्यांना उडानपुलाचे प्रनेते सुध्दा म्हणतात आणि आता भारताला महामार्गाच्या जाळ्याच्या बाबतीत जगात दुसऱ्या क्रमांकावर आणुन गडकरींनी नवीन इतिहास घडविला आहे. नागपूरच्या विकासाची गोष्ट केली तर आज नागपुरचा संपूर्ण कायापालट झाल्याचे दिसून येते. ही बाब संपूर्ण देश अनुभवत आहे.

नागपूर हे भारताचे मध्यवर्ती ठिकाण व केंद्रबिंदू आहे. आपातकालीन परिस्थितीत सुरक्षेच्या दृष्टिकोनातून नागपूरची निवड केली जाते.त्या अनुषंगानेच नागपूरचा विकास होत असावा. विदर्भाला संतांची भूमी म्हणून सुद्धा ओळखले जाते. संत, थोर महात्म्यांच्या आचार विचारांची जपणूक हीच खरी संस्कृती होय. आज आपली संस्कृती काय आहे हे सर्वांनाच माहीत आहे.परंतु गडकरींच्या अनेक कार्यक्रमाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील सांस्कृती जोपासण्याचे कार्य होत असल्याचे दिसून येते. आजच्या पिढीला आपल्या संस्कृतीचा विसर पडत असल्याचे दिसून येते. खासदार महोत्सवाच्या माध्यमातून आपल्या संस्कृतीला जिथे-कुठे खिंडार पडले असेल. त्याला दुरुस्त करण्याचा विडा गडकरींनी घेतल्याचे दिसून येते.१९४७ नंतर नागपूरमध्ये अनेक खासदार होवून गेले.परंतु गडकरींचा काळ हा वाखाणण्याजोगा आहे. कमी कालावधीत महाराष्ट्रासह संपूर्ण भारताचा विकास रोडच्या व उड्डाणपूलाच्या माध्यमातून करून देशाला विकासाची नवीन दिशा दिली आहे आणि जगात महामार्गाचा डंका वाजवला. याचाच गाजावाजा आज आपल्याला जगात पहायला मिळतो. त्यामुळे गडकरी भारताचेच नाही तर जगाचे विकास पुरूष आहेत असे मी समजतो.

खरोखरच महाराष्ट्राचा व देशाचा विकासाचा मार्ग मोकळा करणारा आणि सांस्कृतिक वारसा टिकविणारा पुत्र नागपूर भूमित जन्माला आला ही देशासाठी गौरवाची बाब आहे.ज्या दिवसापासुन खासदार झाले तेव्हा पासून त्यांचा कामाचा सपाटा जोरदार सुरू आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या कामाची चर्चा भारतातच नाही तर जगभरात प्रसिद्ध आहे ही नागपूरकरांसाठी व महाराष्ट्रासाठी मोठी अभिमानाची गोष्ट आहे. गडकरींनी विकासाची सुरूवात उड्डाण पूलापासुन केली ती आज विकासाच्या शिखरापर्यंत जाणवु ठेपली आहे आणि आता विकासासोबतच सांस्कृतीची व क्रीडा क्षेत्राची जोपासना करण्याचे दायित्व त्यांनी स्वीकारल्याचे दिसून येते. यासाठी त्यांनी आपली संपूर्ण ताकद पुर्णपणाला लावली आहे.भारतात अनेक ठिकाणी आपल्याला जातीय दंगली दिसून येतात. परंतु असामाजिक तत्वांनी नागपूरमध्ये १८ मार्च २०२५ ची औरंगजेब यांच्या समाधीवरून उसळलेली दंगल वगळता कोणतीच जातीय दंगल अथवा टोकाचे मतभेद व वाद झाल्याचे दिसून येत नाही.

नागपूरमध्ये संघ कार्यालय, दीक्षाभूमी, ताजबाग, गणेश टेकडी,चर्च इत्यादी अनेक धर्मांची पुरातन स्थळे आहेत. त्याचे जतन सर्वधर्मीय करतात. गडकरी यांचे वैशिष्ट्य म्हणजे सर्व धर्मांच्या लोकांना घेऊन चालने व समाजामध्ये सर्वच धर्मांविषयी आदराची भावना निर्माण करून सर्वांना एकसुत्रीत बांधून ठेवण्याचे महत्वाचे काम गडकरींनी केले आणि करीत आहेत. खासदार सांस्कृतिक महोत्सवाच्या माध्यमातून समाज कार्यासह लोकांनी आपल्या संस्कृतीचे जतन कसे करता येईल याची जाणीव करून देण्याचे कार्य गडकरी करीत आहे.नागपुरला राजकीय दृष्ट्या संघभूमी म्हणून भारतासह जगभर ओळखले जाते. परंतु आजही नागपूरमधील हिंदू-मुस्लिम-शिख-ईसाइ-बौध्द एकोप्याने राहतात.ही नागपूरसाठी व नागपूरकरांसाठी सन्मानाची बाब आहे.

गडकरी नागपूरचे खासदार झाले म्हणूनच विकास झाला आणि त्यांच्यामुळेच संस्कृतीचे जतन कसे करावे याची शिकवण खासदार महोत्सवाच्या माध्यमातून युवकांना मिळत असते.आज गडकरींच्या कामाची शैली व एकाग्रता लक्षात घेता ते भारतासाठी "विकासपुरुष" आहे. खासदार सांस्कृतिक महोत्सवाच्या निमित्ताने महाराष्ट्राचे सांस्कृतिक वैभव पुनजीर्वीत करण्याचे काम करीत आहे.खासदार महोत्सवामध्ये कला, संस्कृती, साहित्य यासोबतच मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे दर्शन सुध्दा होते.

१९९७ मध्ये असाच सांस्कृतिक कार्यक्रम गडकरी यांनी स्वातंत्र्याला ५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने यशवंत स्टेडियम येथे आयोजित केला होता. त्यातही आपल्याला कला, साहित्य व सांस्कृतिची जडन-घडन दिसून आली.असे विकास पुरूष केंद्रीय मंत्री सन्माननीय नितीनजी गडकरी यांची विकासाची गती उच्च शिखरावर जावो आणि महाराष्ट्रासह भारताचा विकास आणखी गतीशील होवो हीच ईश्वरचरणी प्रार्थना. वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा.


- ९९२१६९०७७९

दैनिक **सिंहवाणी वृत्त**

**'सेवश्री'**
सकल जणांचा उद्धारू

Mail Id : sinhvanivrutta@gmail.com
Epaper : epaper.sinhvani.com






# नितीन गडकरी आणि विदर्भाच्या जलक्रांतीचा वेध

**पाणीदार महाराष्ट्राच्या वाटचालीचे शिल्पकार**

महाराष्ट्राच्या, विशेषतः विदर्भाच्या मातीचा आणि पाण्याचा संघर्ष ऐतिहासिक आहे. एका बाजूला अस्मानी संकटांचे सावट आणि दुसऱ्या बाजूला सिंचनाच्या अपुऱ्या सुविधांमुळे होरपळणारा बळीराजा, हे विदर्भाचे विदारक चित्र बदलण्यासाठी ज्या काही मोजक्या द्रष्ट्या नेत्यांनी भगीरथ प्रयत्न केले, त्यात केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. "रस्ते आणि पायाभूत सुविधांचे महामेरू" म्हणून जागतिक कीर्ती मिळवणाऱ्या गडकरीजींनी केवळ जमिनीवरील दळणवळणच सुधारले नाही, तर महाराष्ट्राची आणि विदर्भाची तहान भागवण्यासाठी 'जलसंधारण' आणि 'सिंचन' क्षेत्रातही एक मूक पण अत्यंत प्रभावी क्रांती घडवून आणली आहे.


लेखक



**अजय बिवडे**
संपादक, दै. सिंहवाणी वृत्त


**१. जलसंधारणाची नवी दृष्टी: 'बुलढाणा पॅटर्न' आणि नद्यांचे पुनरुज्जीवन**

नितीन गडकरी यांच्या विकासकामांची शैली नेहमीच पारंपरिक चौकटीबाहेरची राहिली आहे. विदर्भातील शेतकरी आत्महत्या आणि पाण्याचे दुर्भिक्ष यावर केवळ कोरडी सहानुभूती न दाखवता त्यांनी कायमस्वरूपी उपाययोजनांवर भर दिला. त्यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या 'बुलढाणा पॅटर्न' ची दखल आज केंद्र सरकारने आणि नीती आयोगानेही घेतली असून तो देशभरात लागू केला जात आहे.

**शाश्वत जलसंधारण:** राष्ट्रीय महामार्गांचे काम करत असताना, रस्त्यांच्या भरावासाठी लागणारी माती आणि मुरूम बाजूच्याच स्थानिक नाले, तलाव आणि नद्यांमधून उपसण्यात आला.

**दुहेरी फायदा:** यामुळे शासनाचा रस्ते निर्मितीचा कोट्यवधी रुपयांचा खर्च वाचला आणि दुसरीकडे नद्या, नाले व तलावांचे विनामूल्य खोलीकरण व रुंदीकरण झाले.

**परिणाम:** या अभिनव प्रयोगामुळे विदर्भातील शेकडो गावांना जलसमृद्धी मिळाली आहे. पावसाचे पाणी वाहून न जाता जमिनीत जिरल्यामुळे भूजल पातळीत कमालीची वाढ झाली असून, अनेक दशकांपासून कोरडे पडलेले पाण्याचे स्रोत पुन्हा जिवंत झाले आहेत.

**२. 'पूर्ती जलसिंचन संस्था': सहकारातून समृद्धीचा पाया**

नितीन गडकरी यांच्या जलसंकल्पनेचा, सामाजिक बांधिलकीचा आणि कृषी-औद्योगिक दृष्टीचा एक अत्यंत महत्त्वाचा आविष्कार म्हणजे 'पूर्ती जलसिंचन संस्था'. विदर्भासारख्या शेतकरी आत्महत्याग्रस्त भागात केवळ पावसाच्या पाण्यावर अवलंबून राहणे म्हणजे जुगार खेळण्यासारखे होते. हे ओळखून गडकरीजींनी या संस्थेच्या माध्यमातून सिंचन क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा पाया रचला.

**पाण्याचे शास्त्रशुद्ध व्यवस्थापन:** पूर्ती संस्थेने केवळ पाणी अडवण्यावर भर दिला नाही, तर उपलब्ध पाण्याचा थेंब अन् थेंब कसा पिकांच्या मुळापर्यंत पोहोचेल आणि पाण्याचा अपव्यय कसा टाळता येईल, याचे उत्तम नियोजन केले.

**आधुनिक सिंचन पद्धती:** उपसा जलसिंचन योजना आणि ठिबक सिंचनाला प्रोत्साहन देऊन संस्थेने पारंपरिक आणि कालबाह्य शेती पद्धतीला फाटा दिला.

**आर्थिक परिवर्तन:** सिंचनाच्या



सुविधांमुळे विदर्भातील शेतकऱ्यांना कापूस आणि सोयाबीनच्या पलीकडे जाऊन ऊस, फळबागा आणि अन्य नगदी पिके घेणे शक्य झाले. यामुळे शेतकऱ्यांच्या हातात चार पैसे खेळू लागले आणि त्यांच्या आर्थिक स्तरात लक्षणीय सुधारणा झाली.

**३. जलयुक्त शिवार आणि सिमेंट नाला बांध: तळागाळातील जलक्रांती**

महाराष्ट्रात राबविल्या गेलेल्या 'जलयुक्त शिवार अभियाना'ला गती देण्यात आणि लोकसहभागातून जलसंधारणाची कामे उभी करण्यात गडकरीजींचा मोठा वाटा राहिला आहे. नागपूर आणि आसपासच्या ग्रामीण भागात त्यांनी स्वखर्चातून आणि विविध संस्थांच्या माध्यमातून 'सिमेंट नाला बांध' बांधण्याची मोहीम हाती घेतली. यामुळे पावसाचे वाहून जाणारे पाणी जागच्या जागी अडवले गेले, ज्यामुळे उन्हाळ्यातही विहिरींना पाणी राहू लागले आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटण्यास मदत झाली.

**४. गोसीखुर्द आणि महाराष्ट्रातील प्रलंबित सिंचन प्रकल्पांना संजीवनी**

केंद्रीय जलसंसाधन, नदी विकास आणि गंगा पुनरुज्जीवन मंत्री म्हणून काम करत असताना गडकरीजींनी महाराष्ट्राच्या रखडलेल्या सिंचन क्षेत्राला मोठा आर्थिक बुस्टर डोस दिला. वर्षानुवर्षे निधीअभावी आणि प्रशासकीय लालफितशाहीत अडकलेले २५ ते ३० सिंचन प्रकल्प त्यांनी 'प्रधानमंत्री कृषी सिंचन योजने'च्या अंतर्गत विशेष आर्थिक पॅकेज देऊन मार्गी लावले.

**गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्प:** विदर्भाची भाग्यरेषा समजला जाणारा 'गोसीखुर्द प्रकल्प' गेल्या तीन दशकांपासून रखडला होता. गडकरीजींनी वैयक्तिक लक्ष घालून, निधीची उपलब्धता करून देत या प्रकल्पाच्या कामाला अभूतपूर्व गती दिली. यामुळे नागपूर, भंडारा आणि चंद्रपूर जिल्ह्यातील लाखो हेक्टर जमीन सिंचनाखाली येत आहे.

**तापी पार-नर्मदा नदी जोड प्रकल्प:** खान्देश आणि उत्तर महाराष्ट्राची तहान भागवण्यासाठी त्यांनी आंतरराज्यीय नदी जोड प्रकल्पांचे धाडसी नियोजन केले, ज्यामुळे अतिरिक्त पाणी दुष्काळी भागाकडे वळवणे शक्य होणार आहे.

**५. सांडपाण्यावर प्रक्रिया: 'वेस्ट टू वेल्थ' (टाकाऊतून टिकाऊ) संकल्पना**

नितीन गडकरी हे केवळ पाणी अडवण्यावरच नाही, तर पाण्याचा पुनर्वापर करण्यावरही भर देतात. नागपूर महानगरपालिकेच्या माध्यमातून त्यांनी सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याचा प्रकल्प उभारला.

हे प्रक्रिया केलेले पाणी त्यांनी कोराडी आणि खापरखेडा येथील वीज निर्मिती केंद्रांना विकण्याचा यशस्वी प्रयोग केला. यामुळे नागपूर महानगरपालिकेला उत्पन्नाचा नवा स्रोत मिळाला आणि वीज केंद्रांसाठी लागणारे मौल्यवान पिण्याचे पाणी वाचले, जे आता सिंचनासाठी आणि नागरिकांसाठी उपलब्ध होत आहे.

"पाणी हे केवळ निसर्गाचे देणे नाही, तर ते मानवी कष्टाने आणि दूरदृष्टीने जपायचे अमृत आहे." हाच विचार उराशी बाळगून नितीन गडकरी यांनी विदर्भाच्या आणि महाराष्ट्राच्या तप्त भूमीवर जलसंधारणाचे एक नवे महाकाव्य लिहिले आहे. त्यांनी पाडलेले पाझर तलाव, खोलीकरण केलेल्या नद्या, 'पूर्ती'सारख्या संस्थांच्या माध्यमातून उभे राहिलेले सिंचनाचे जाळे आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, हे केवळ सिमेंट आणि मातीचे बांधकाम नाही; तर ती विदर्भाच्या डोळ्यांतील अश्रू पुसून तिथे समृद्धीचे हिरवेगार हसू फुलवणारी आधुनिक 'भगीरथी' आहे.

रस्ते बांधणारा हा 'कर्मयोगी' जेव्हा मातीची तहान ओळखून पाण्याचे नियोजन करतो, तेव्हा महाराष्ट्राच्या मातीतून आत्मविश्वासाचे आणि स्वावलंबनाचे नवे अंकुर फुटतात, हेच त्यांच्या जलविकासाचे खरे आणि शाश्वत यश आहे.

**- नागपूर**
**मो. ८६९८७८८६६६**




दैनिक सिंहवाणी वृत्त

'सेवश्री'
सकल जणांचा उद्धारू

Mail Id : sinhvanivrutta@gmail.com    Epaper : epaper.sinhvani.com    ५    दिनांक : बुधवार, २७ मे २०२६



# विकास, संवेदनशीलता आणि दूरदृष्टी यांचा संगम : नितीनजी गडकरी

लेखक



नितीन कुळकर्णी
नागपूर

देशाच्या राजकारणात अनेक नेते येतात, कार्य करतात आणि काळाच्या ओघात विस्मरणात जातात; मात्र काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात, जी आपल्या कामाच्या ठशाने जनमाणसात कायमची कोरली जातात. नितीन गडकरी हे असेच एक व्यक्तिमत्त्व आहे. विकासाला केंद्रस्थानी ठेवून काम करणारा, समाजातील प्रत्येक घटकाला आपलेसे करणारा, संवेदनशीलतेसह निर्णयक्षम नेतृत्व करणारा नेता म्हणून त्यांची ओळख देशभर निर्माण झाली आहे.

कृषी, जलव्यवस्थापन, आरोग्य, शिक्षण आणि पायाभूत सुविधा क्षेत्रातील नितीन गडकरी यांच्या योगदानाचा आढावा घेतला, तर एका व्यापक विकासदृष्टीचा प्रत्यय येतो.

### विकासाची राजकारणाला नवी दिशा

'ना जात, ना पात, केवल विकास की बात' ही भूमिका केवळ घोषवाक्य म्हणून नव्हे, तर प्रत्यक्ष कामातून जगणारे नेतृत्व म्हणजे नितीनजी गडकरी. त्यांनी विकास हा केवळ शहरापुरता मर्यादित न ठेवता ग्रामीण भारताच्या उन्नतीशी जोडला. त्यामुळेच विदर्भातील शेतकरी, ग्रामीण युवक, उद्योजक आणि सर्वसामान्य नागरिक यांच्यात त्यांच्याबद्दल विशेष आत्मीयता आहे.

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे, याची जाणीव ठेवून नितीनजींनी कृषी क्षेत्रात अनेक अभिनव संकल्पना पुढे आणल्या. शेतकरी केवळ उत्पादन करणारा न राहता 'ऊर्जा उत्पादक' आणि 'उद्योजक' व्हावा, ही त्यांची भूमिका राहिली आहे.

जैवइंधन, इथेनॉल, बायोगॅस, बांबू उद्योग, कृषी प्रक्रिया उद्योग, शेतीपूरक व्यवसाय या संकल्पनांना त्यांनी प्रोत्साहन दिले. शेती उत्पादनाला बाजारपेठ मिळावी, शेतमालावर प्रक्रिया व्हावी आणि ग्रामीण भागात रोजगार निर्माण व्हावा, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले.

अग्रोविजन या उपक्रमाद्वारे त्यांनी कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञान, संशोधन आणि नवकल्पना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचे मोठे कार्य केले. गेल्या अनेक वर्षांपासून हा उपक्रम देशातील शेतकऱ्यांसाठी प्रेरणास्थान ठरला आहे. जलक्रांतीची व्यापक संकल्पना

विदर्भाने अनेक वर्षे दुष्काळ आणि पाण्याच्या समस्येचा सामना केला आहे. ही वेदना ओळखून नितीनजींनी जलसंधारणाला लोकचळवळीचे स्वरूप दिले. नागपुरात नुकतीच यशस्वीरित्या पार पडलेली जलक्रांती परिषद याचे उदाहरण होय.

'धावणाऱ्या पाण्याला थांबवा, थांबलेल्या पाण्याला चालवा आणि चालणाऱ्या पाण्याला जमिनीत मुरवा' हा त्यांचा मंत्र आज अनेक गावांसाठी विकासाचा आधार ठरत आहे.

लहान सिंचन प्रकल्प, शेततळी, नाला खोलीकरण, गाळमुक्त धरणे, जल पुनर्भरण, नदीजोड प्रकल्प यांसारख्या संकल्पनांवर त्यांनी सातत्याने भर दिला. जलव्यवस्थापनाच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करण्याचा त्यांचा प्रयत्न अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

पूर्ती सिंचन समृद्धी व कल्याणकारी संस्था मार्फत गेली अनेक वर्षे जलसंधारण, ग्रामीण विकास आणि शाश्वत शेतीसाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत. या कार्यामागे नितीनजींची प्रेरणा आणि दृष्टी



स्पष्टपणे दिसून येते.

### आरोग्य क्षेत्रातील संवेदनशील उपक्रम

राजकारणात कार्यरत असूनही समाजातील दुर्बल घटकांबद्दल असलेली त्यांची संवेदनशीलता विशेष उल्लेखनीय आहे. ग्रामीण भागात गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने विविध आरोग्यविषयक प्रकल्पांना त्यांनी चालना दिली.

स्व. भानुताई गडकरी ग्रामीण विकास संस्था अंतर्गत सुरू करण्यात आलेल्या विविध उपक्रमांमुळे सामान्य नागरिकांना परवडणाऱ्या दरात वैद्यकीय सेवा उपलब्ध होत आहेत. आधुनिक डायग्नोस्टिक सेंटर, आरोग्य शिबिरे आणि जनजागृती कार्यक्रम यांमुळे ग्रामीण व मध्यमवर्गीय कुटुंबांना मोठा आधार मिळत आहे.

कोरोना काळातही त्यांनी वैद्यकीय सुविधा, ऑक्सिजन, अन्नधान्य आणि मदतकार्य यामध्ये सक्रिय सहभाग घेत संवेदनशील नेतृत्वाचे दर्शन घडवले.

### शिक्षण आणि कौशल्य विकासावर भर

देशाचा विकास हा शिक्षणाशिवाय शक्य नाही, यावर त्यांचा ठाम विश्वास आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि कौशल्य प्रशिक्षण मिळावे यासाठी त्यांनी विविध संस्थांच्या माध्यमातून प्रयत्न केले. तंत्रज्ञानाधारित शिक्षण, कौशल्य विकास, रोजगाराभिमुख प्रशिक्षण आणि उद्योजकता विकास यावर त्यांनी नेहमी भर दिला. ग्रामीण युवकांनी नोकरी शोधणारे न बनता रोजगार निर्माण करणारे व्हावे, हा त्यांचा दृष्टिकोन आहे.

देशातील रस्ते, महामार्ग, पूल आणि दळणवळण व्यवस्थेच्या विकासात नितीनजी गडकरी यांचे योगदान ऐतिहासिक मानले जाते. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री म्हणून त्यांनी देशात अभूतपूर्व गतीने पायाभूत सुविधा उभारल्या.

एक्सप्रेसवे, राष्ट्रीय महामार्ग, उड्डाणपूल, लॉजिस्टिक पार्क, जलमार्ग आणि हरित वाहतूक व्यवस्थेवर त्यांनी विशेष भर दिला. त्यांच्या कार्यकाळात रस्ते विकासाला मिळालेली गती ही भारताच्या आर्थिक प्रगतीसाठी महत्त्वाची ठरली आहे. विदर्भाला राज्याच्या मुख्य प्रवाहाशी जोडण्यामध्ये या प्रकल्पाचे मोठे योगदान आहे.

### संवेदनशील आणि हळवे व्यक्तिमत्त्व

मोठ्या पदावर असूनही सामान्य कार्यकर्त्यांशी आणि सर्वसामान्य नागरिकांशी आत्मीयतेने वागणारा नेता म्हणून त्यांची वेगळी ओळख आहे. एखाद्या कार्यकर्त्याची अडचण, शेतकऱ्याचे संकट किंवा सामाजिक प्रश्न याकडे ते केवळ प्रशासकीय दृष्टीने पाहत नाहीत, तर मानवी संवेदनांनी त्याकडे पाहतात.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वात विकासदृष्टीसोबत माणुसकीचा ओलावा आहे आणि त्यामुळेच समाजातील सर्व स्तरांमध्ये त्यांच्याबद्दल आदरभाव आहे.

### प्रेरणादायी नेतृत्व

आज देशाला केवळ राजकीय नेतृत्व नव्हे, तर दूरदृष्टी असलेले, विकासाला प्राधान्य देणारे आणि समाजाच्या प्रत्येक घटकाला सोबत घेऊन चालणारे नेतृत्व आवश्यक आहे. नितीनजी गडकरी यांचे कार्य हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा व्यक्त करताना, त्यांनी दाखवलेला विकासाचा मार्ग अधिक व्यापक व्हावा आणि त्यांच्या संकल्पनांमधून ग्रामीण भारत अधिक सक्षम व्हावा, हीच अपेक्षा.

- ७८७५५५६२२३





# फक्त गडकरी !

## (संतश्रेष्ठ गजानन महाराजांचा जगातील पहिला बोलका ग्रंथ साकार होण्याची गोष्ट...)





लेखक



श्याम पेठकर
ज्येष्ठ पत्रकार, लेखक

मी संपादक-पत्रकार असतानाही कुठल्या राजकीय नेत्याशी व्यवसायिक स्नेह वाढविण्याचा प्रयत्न केला नाही. तशा कुठल्याच 'फायद्या'चा विचार करून त्या काळात संबंध जोडले नाही. व्यवसायाच्या पलिकडे जाऊन अगदी नैसिर्गिक स्नेह जिथे जुळला तिथे मी कायम राहिलो. राजकीय नेत्यांशीही स्नेह निर्माण झाला; पण अगदीच मोजक्या. त्यात नितीनजी गडकरी आहेत. त्यातही 'राजकारण' हा विषय नव्हताच. राजकीयदृष्ट्या मी त्यांच्या फायद्या/ तोट्याचा कधी नव्हतो आणि नाहीदेखील. मी कधी त्यांच्याकडे स्वतःसाठी मागायला गेलो नाही. राजकारणाच्या पलिकडे जाऊन काहीतरी करत राहणे, हा नितीनजी गडकरी यांचा स्वभाव आहे. कधीकधी ते राजकारणी वाटतच नाहीत. माणसं ओळखणे, त्यांच्यातल्या गुणांची कदर करणे आणि सार्वजनिक जीवनात, समाजाच्या कामासाठी त्याचा उपयोग करणे अन् असल्या कामात आठवणीने त्यांना संधी देणे, हा त्यांचा स्वभाव आहे म्हणा किंवा वैशिष्ट्य आहे. हा कलावंत मूडचा आहे, क्रिएटिव्ह आहे, सामाजिक काम करणारा आहे, हे पाहून मग ते त्या माणसाला तसे काम त्याने न मागताही देतात...

अनेकदा त्यांच्याशी अनौपचारिक गप्पा नाही; पण बोलण्याची संधी मिळाली आहे. त्या त्या वेळी हे जाणवले आहे की, मी राजकारणावर किंवा त्या संबंधित बोलणे त्यांना फारसे रुचत नाही. 'तू तुझी विधा सोडू नकोस.', असेच ते त्यांच्या त्या वेळच्या प्रतिक्रियेतून सांगतात.

मी गजानन महाराजांची पोथी, 'श्री गजानन विजय ग्रंथ'ची चित्रकथा केली. म्हणजे ती गोष्ट मी कॉमिक्सच्या रूपात साकार केली. अनेकांना हा प्रकार आवडला. सरसंघचालक मोहनजी यांनी स्वतःहून ते प्रकाशित केले. अर्थात त्यासाठी तेव्हा विदर्भ प्रदेश संघचालक असलेले प्रसादजी महानकर हे कारणीभूत होते. हा ग्रंथ माझे श्रध्देचे स्थान पितृतुल्य शिवशंकरभाऊ पाटील यांच्या हस्तेही प्रकाशित झाला. भाऊंचे आशीर्वचनदेखील या ग्रंथाला लाभले.

मी माझे कुठलेही पुस्तक प्रकाशित झाले की काही लोकांना आवर्जुन देतो. त्यात लोकमतचे सर्वेसर्वा विजयबाबू दर्डा आहेत तसेच नितीनजीही आहेत. हे पुस्तकही मी नितीनजींना दिले. तेही श्री गजानन महराजांचे भक्त असल्याने त्यांच्यासाठी ही जीवाची भेट होती. पुस्तक भेट देताना कुठलाही हेतू नव्हता. त्यांच्याकडे मी नेहमीच निहेर्तूक मनानेच जात असतो. याहीवेळा तसाच गेलो. त्यांना पुस्तक दिले. परत आलो...

एक तीन-चार दिवसांनी गिरीश गांधी यांचा फोन आला. भेटायला जाताना त्यांनाही हे पुस्तक भेट दिले. ते म्हणाले, "इतकी कमी किंमत का ठेवली ? खर्डा बाइंडिंग, इतकी चित्रे, स्टोरीबोर्ड लेखन हे सगळे अगदी प्रोफेनल असताना या पुस्तकाची किंमत सहजच सात- साडेसातशे रुपये ठेवता आली असती..." मी म्हणालो, "भय्या यात व्यवसाय करायचा नाही. झाला तेवढा खर्च निघाला खूप आहे...'

त्यानंतर गिरीशभय्यांना फझोन आला, "तुझी शंभर पुस्तके पाठवून दे... साडेतीनशेच्या हिशेबाने पस्तीस हजाराचा चेक घेऊन जा..." मला आश्चर्य वाटले. पुस्तक पोहोचवली. त्यांनी चेकचे पाकीट दिले. घरी येऊन पाकिट उघडले तर चेकसोबत त्यांच्या विदर्भ प्रतिष्ठानचे पत्र होते. त्यात स्पष्ट उल्लेख होता, "सन्माननिय नितीनजी गडकरी यांच्या आदेशावरून ही पुस्तके खरेदी केली आहेत. ती भक्तांमध्ये वाटायची आहेत."

ते वाचून गडकरी हा माणूस न बोलता नकळतपणे कशी दखल घेतो आणि चांगले काम करणाऱ्यांची कदर करतो... आपण एक पुस्तक केले. तो आपल्या पॅशनचा भाग होता. नितीनजींनी त्याची अशी दखल घेतली, हा विषय काळजात कोरला गेला. त्यांनी नंतरच्या भेटीतही कधीही हा विषय काढला नाही. तुमची पुस्तके मी खरेदी केली, अशी उपकार केल्याची भावना थोपवली नाही... माणसे आपल्या क्षेत्रात मोठी का होतात, हे कळले... पण, हे इथेच थांबले असे माझे वाटणे चुकीचे होते. गडकरी ही व्यक्ती नाही समष्टी आहे अन् तुमच्या समज, जाणिवांच्या क्षितीजाच्या पलिकडे गडकरी आहेत, हे नंतर कळत गेले...

भगवत गीता सोळा भारतीय भाषांमध्ये प्रकाशित करण्यात आली. श्री श्री रविशंकर यांचा हा उपक्रम होता. विणेच्या आकाराच्या सेन्सरने ही गीता सोळा भाषात ऐकता येणार होती. अर्थातच त्याची दखल पंतप्रधानांच्या पातळीपासून घेतली गेली. त्यानंतर हनुमान चालिसा अशा रूपात आला. 'सेफ शॉपी' या साखळी विक्रीच्या संस्थेची ही निर्मिती होती. त्यात संजय जैन, गिरीश देशमुख, उमेश महाजन, अमर इंदूरकर ही मंडळी होती. ही मंडळी गजानन महाराजांची भक्त... यांच्या मनात गजानन महराजांची पोथी म्हणजे गजानन विजय ग्रंथही या रूपात यावा, अशी कल्पना आली. प्रकल्प मोठा होता. दिल्लीला ही मंडळी नितीनजींना भेटली. त्यांनी ही कल्पना नितीनजींच्या कानावर घातली. त्यांनाही ती आवडली. ते नाविन्याच्या शोधात असतातच. इनोव्हेशन हा त्यांचा आवडता विषय... त्यांनी आपण खर्च करू; पण तुम्ही हा ग्रंथ कमी किमतीत विकायचा कारण गजानन महाराजांची भक्त मंडळी ही आर्थिकदृष्ट्या खूप सधन नसतात, अशी अट घातली. आता प्रश्न होता, 'पोथीला चाल लावणे, त्याचा अर्थ तीन भाषात लिहीणे, चित्रे काढून मांडणी सजावट करणे, हे काम कोण करणार ?'

नितीनजींनी त्यांना सांगितले, हे सगळे क्रिएटिव्ह काम श्याम पेठकर करेल... तेव्हा मी तरुण भारतच्या संपादक पदाचा राजीनामा दिला होता आणि मुंबईला शिफ्ट होणार होतो. श्यामला यावेळी कामाची गरज आहे आणि मग त्याला आवडते असे काम दिले पाहिजे, अशा प्रकारे मदत केली पाहिजे, हा एक भाव त्यामागे होता आणि दुसरे म्हणजे कलावंत- लेखक आहे हा, महाराजांचा भक्त आहे त्याने चित्रकथा रूपात ग्रंथ मांडला आहे, याची दखलही होती.

गिरीश देशमुखांचा मला फोन आला. नितीनजींनी हे काम तुमच्याकडे द्यायला सांगितले आहे, हे त्यांनी सांगितले. तोवर गिरीशजींना मी ओळखत होतो. तेही मला ओळखत होते; पण स्नेह- मैत्री नव्हती. हे ऐकून मी दिडमूढ की काय म्हणतात तसा झालो... गडकरी हा माणूस खरेच आपल्या सामान्य समजुतीच्या कक्षेच्या बाहेरचा आहे, याचा साक्षात्कारच झाला.

नंतर आम्ही नितीनजींच्या नागपूरच्या घरी भेटलो. या प्रकारचे मुद्रण केवळ दिल्ली आणि बंगलोरलाच होते. दिल्लीवाल्यांचे मत होते की, नागपुरात या दर्जाचे काम होणार नाही. मराठीचा संबंध असल्याने चित्रे, लेखन, ध्वनिमुद्रण, संगित, गायन हे काम मुंबईत व्हावे. संजय जैन यांनी तर बोलून दाखविले की, फिल्म इंडस्ट्रीतला माणूस हवा. आवाज ख्यातनाम नटांचा, गायकांचा हवा. नितीनजींनी माझ्याकडे पाहिले. मी म्हणालो, "हे काम नागपूर- विदर्भाच व्हावे... होऊच शकते." नितीनजी मग त्यांच्या ठाम गडकरी शैलीत म्हणाले, "हमारे लीए श्यामही इंडस्ट्री है... वो जो करेंगा वो फायनल रहेगा..."

त्यांनी खूप मोठा विश्वास टाकला होता. 'वर्ड्स अँड व्ह्यूज' ही आमची कंपनी आहे. त्यामार्फत मी कामे करतच होतो. ग्रंथ निर्मिती, चित्र, ऑडिओ- व्हिज्युअल, ट्रान्सलेशन, जाहिरात लेखन, निर्मिती, चित्रपटांच्या पटकथा- संवाद लेखन. मात्र हे काम खूप मोठे होते. टीम होतीच. विरेंद्र लाटणकर या मित्राने आमच्या नाटक, चित्रपटांना संगीत दिले होते. उमेश चारोळे, संजय मोरे हे चित्रकार सहकारी होते. राजू क्षिरसागर हा मांडणी- सजावटीतला मास्टर होता. मी, माझी पत्नी भाग्यश्री हे लेखन, भाषांतर करणार होतो. अभ्यास सुरू झाला. आमचे मित्र शेगाव संस्थानचे संचालक राजेंद्र शेगोकार यांनी खूप मदत केली. पहिला डेमो अध्याय झाला. नितीनजींनी दाखविला. दिल्लीवालेही अचंबित होते की, या दर्जाचे काम नागपुरात होते. नितीनजी म्हणाले, "दिल्लीवालो को लगता है की नागपूर की सडकों पर अबभी शेरही घुमते है..."

तीन वर्षांच्या सामुहिक परिश्रमातून ग्रंथ साकार झाला. १५ मार्च २०२६ रोजी सुरेश भट सभागृहात याचा देखणा प्रकाशन सोहया झाला. इंस्टा ग्रोथ मर्चंटाईजचे गिरीश देशमुख, उमेश महारजन, अमर इंदूरकर यांच्यासह संजय जैन यांनी दांडगा कार्यक्रम उभा केला. शेगाव नगरीच साकार झाली होती भट सभागृहात.

पहिला एक हजार प्रतींचा लॉट विकलाही गेला. १५०००रु. मूळ किंमत असलेला ग्रंथ नितीनजींच्या आदेश आणि आर्थिक सहकार्यामुळे पन्नास टक्के किंमतीत ७५००रु. ला विकलाही गेला. जगातल्या सात-आठ देशात ग्रंथ पोहोचला. देशात उत्तर- दक्षीण, पूर्वेत्तर राज्यातही ग्रंथ पोहोचला. अगदी तीनशे रुपयात हा पाच किलो वजनाचा ग्रंथ देशभर पोहोचविण्याचे काम सेंट्रल पोस्ट ऑफिसचे विश्वजित व्यवधाने यांनी केले.

एक मोठे काम आपल्या हातून घडले. ते घडविले ते गजानन महाराजांनी आणि साकार झाले ते केवळ आणि केवळ नितीनजी गडकरी यांच्यामुळे. काम करायचे आणि पुढे निघून जायचे, हा त्यांचा स्वभाव.

***सारे काही देता यावे,***
***श्रेय राहू नये हाती***
***लावी लावता कपाळी***
***भक्तीभावनेने माती***

या म. म. देशपांडे यांच्या कवितेतील भावाचे जीवंत रूप म्हणजे नितीनजी गडकरी... म्हणून ते फक्त आणि फक्त गडकरी आहेत !

**- नागपूर/मुंबई**
**मो. ८५५४९८२६७७**



दैनिक **सिंहवाणी वृत्त**


Reg. No : MHBIL/25/A4140

प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर | संपादक : सुनील कुहीकर | संचालक-संपादक : अजय बिवडे

Epaper : epaper.sinhvani.com | दिनांक : बुधवार, २७ मे २०२६ | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : १६७ | किंमत : २ रूपये


**आजच्या अंकासोबत विशेष पुरवणी**




ना. नितीन गडकरी यांच्या वाढदिवसानिमित्त दै. सिंहवाणी वृत्तच्या वतीने प्रकाशित 'सेवश्री सकल जणांचा उद्धारू' ही विशेष पुरवणी आजच्या अंकासोबत देण्यात येत आहे. याची एजंट, वाचक, विक्रेते यांनी नोंद घ्यावी.




## १२ वीचा निकाल बदलणार

**नवी दिल्ली :** केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) इयत्ता १२ वीच्या निकालाबाबत एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांमध्ये अदलाबदल झाल्याची गंभीर चूक सीबीएसई बोर्डाने अखेर मान्य केली आहे. सोशल मीडियावर विद्यार्थ्यांनी याविरोधात आवाज उठवल्यानंतर बोर्डाला जाग आली असून, आता संबंधित विद्यार्थ्यांचे गुण सुधारले जाणार असल्याचे बोर्डाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. वेदांत नावाच्या एका विद्यार्थ्याने निकालानंतर उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रतीसाठी अर्ज केला होता. त्याला मिळालेली भौतिकशास्त्राची उत्तरपत्रिका त्याची नसून दुसऱ्याच कोणा विद्यार्थ्याची असल्याचे त्याच्या निदर्शनास आले. वेदांतने हा सर्व प्रकार सोशल मीडियावर शेअर करत बोर्डाच्या कारभारावर आक्षेप घेतला. हा घोळ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर सीबीएसई प्रशासनात खळबळ उडाली. या प्रकरणाची गंभीर दखल घेत सीबीएसईच्या संयुक्त सचिवांनी थेट वेदांतला ईमेल पाठवून या चुकीबद्दल दिलगिरी व्यक्त केली. तुमची भौतिकशास्त्राची खरी उत्तरपत्रिका या ईमेलसोबत जोडली असून नवीन गुणांनुसार तुमचा निकाल लवकरच अपडेट केला जाईल असे बोर्डाने या ईमेलमध्ये स्पष्ट केले आहे.

**रसायनशास्त्राच्या पेपरमध्येही असाच घोळ**

केवळ भौतिकशास्त्रच नव्हे, तर रसायनशास्त्र या विषयाच्या उत्तरपत्रिकेतही असाच घोळ झाल्याचे आणखी एका विद्यार्थ्याने समोर आणले आहे. या विद्यार्थ्यानेही सोशल मीडियावर पोस्ट करत सांगितले की सीबीएसईने आमच्या ईमेलला उत्तर दिले असून रसायनशास्त्राच्या उत्तरपत्रिकेबाबतची आमची तक्रार योग्य असल्याचे मान्य केले आहे. पुढील प्रक्रियेसाठी आम्ही बोर्डाच्या निर्णयाची वाट पाहत आहोत.

वेदांतचे प्रकरण सोशल मीडियावर व्हायरल होताच सीबीएसईने थेट विद्यार्थ्याशी संपर्क साधला. बोर्डाच्या निकालाबाबत सोशल मीडियावर येणाऱ्या प्रत्येक तक्रारीवर लक्ष ठेवण्यासाठी सीबीएसईने आता एक विशेष टीम तैनात केली आहे. निकालानंतर गुणांची पडताळणी करणे, उत्तरपत्रिकेची फोटोकॉपी मिळवणे आणि पुनर्मूल्यांकन करणे यासाठी बोर्ड फी आकारते. मात्र, विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकाच एकमेकांमध्ये बदलल्या गेल्याचा प्रकार समोर आल्याने सीबीएसईच्या एकूणच मूल्यमापन आणि उत्तरपत्रिका हाताळणीच्या सुरक्षिततेवर पालकांमधून आणि विद्यार्थ्यांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

## तीन मुलींचा शेततळ्यात बुडून मृत्यू

**वृत्तसंस्था, कोल्हापूर**

कोल्हापूरच्या चंदगडमध्ये हृदयद्रावक घटना घडली आहे. आजीच्या अन्त्यविधीसाठी आलेल्या तीन शाळकरी मुलींचा हंडेवाडी येथे शेततळ्यात बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना २५ मे रोजी दुपारी सुमारे चार वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त होत असून कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. पोलिसांनी पुढील तपास सुरू केला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, रिया आणि धनुष्का यांच्या वडिलांची आई तसेच स्वराच्या आईची आई असलेल्या सुशीला सांबरेकर (वय ७०) यांचे आठ दिवसांपूर्वी निधन झाले होते. त्यांच्या अन्त्यविधीच्या निमित्ताने कुटुंबीय हंडेवाडी येथे जमले होते. सोमवारी दुपारी तिन्ही मुली गावाजवळील शेततळ्याजवळ गेल्या असता हा दुर्दैवी प्रकार घडला.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तातडीने मदतकार्य सुरू केले. मात्र, तिघींनाही बाहेर काढेपर्यंत उशीर झाला होता. मृत मुलींमध्ये धनुष्का पांडुरंग सांबरेकर (वय १५), रिया चंद्रकांत सांबरेकर (वय १२) आणि स्वरा जयंत नाईक (वय १३) यांचा समावेश आहे. धनुष्का आणि रिया या दोघी मूळच्या आंबेवाडी (ता. बेळगाव) येथील असून सध्या गोव्यातील पर्वरी येथे वास्तव्यास होत्या. तर स्वरा ही मूळची होसूर (ता. चंदगड) येथील असून सध्या उचगाव (ता. करवीर) येथे राहत होती. या घटनेनंतर संपूर्ण गावात शोककळा पसरली असून नातेवाईकांचा आक्रोश हृदय पिळवटून टाकणारा होता. अल्पवयीन मुलींचा असा दुर्दैवी मृत्यू झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

## लालपरीचे तिकिटही वाढणार? : प्रताप सरनाईक

**वृत्तसंस्था, मुंबई**

मागील १० दिवसांत डिझेलच्या दरात ४ वेळा वाढ झाली आहे. त्यामुळे डिझेलच्या किमती प्रति लिटर ७ ते ८ रुपयांनी वाढल्या आहेत. पेट्रोल आणि डिझेलच्या किमती वाढल्याचा फटका एसटी महामंडळालाही बसला आहे. सातत्याने दरवाढ होत असल्याचा फटका एसटी महामंडळाच्या उत्पन्नावरही होत असल्याचे प्रताप सरनाईकांनी सांगितले. त्याशिवाय एसटीच्या तिकिट दरवाढीवर प्रताप सरनाईकांनी स्पष्ट शब्दांत उत्तर दिले आहे.

सध्या एसटी बस तिकिट दरवाढीचा विचार नाही. मात्र वारंवार डिझेलचे दर वाढले तर दरवाढ केल्याशिवाय पर्याय नाही, असे स्पष्ट संकेत प्रताप सरनाईकांनी दिले. सर्वसामान्य प्रवाशांना परवडणारी सेवा देणे हेच एसटीचे मुख्य उद्दिष्ट आहे. मात्र, ऑईल कंपन्यांकडून वारंवार होणारी दरवाढ आणि पुरवठ्यातील तूट यामुळे महामंडळाच्या उत्पन्नावर थेट परिणाम होत आहे. सध्या एसटी भाडेवाढीचा कोणताही विचार नाही. मात्र, जर डिझेलचे दर असेच सातत्याने वाढत राहिले, तर भविष्यात दरवाढ केल्याशिवाय महामंडळासमोर कोणताही पर्याय उरणार नाही, असे सरनाईक यांनी स्पष्ट केले.

**५ लिटर डिझेल वाचवा, चालकांचा सत्कार होणार**

एसटी महामंडळाचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी आता प्रशासनाने एक अनोखी मोहीम हाती घेतली आहे.



महामंडळाच्या सर्व आगारांना दररोज किमान ५ लिटर डिझेल वाचवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. केवळ ५ लिटर डिझेल वाचवल्यास महामंडळाची लाखो रुपयांची बचत होऊ शकते, असे प्रताप सरनाईक म्हणाले. डिझेलची बचत करण्यासाठी सर्व बसेसची तांत्रिक तपासणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. जो चालक सर्वाधिक डिझेलची बचत करेल, त्याचा महामंडळातर्फे विशेष सत्कार केला जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

**दररोज १० लाख लिटरहून अधिक डिझेलची गरज**

एसटी महामंडळाचा गाडा सुरळीत चालवण्यासाठी दररोज १० लाख ८७ हजार लिटर डिझेलची आवश्यकता असते. हा पुरवठा कोणत्याही परिस्थितीत थांबू नये आणि दररोज प्रवास करणाऱ्या राज्यातील सुमारे ५५ लाख सर्वसामान्य प्रवाशांना कोणताही त्रास होऊ नये, यासाठी महामंडळाकडून युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत.

डिझेल पुरवठादार कंपन्या असलेल्या एचपी (हिंदुस्तान पेट्रोलियम), इंडियन ऑईल, नायरा आणि रिलायन्सच्या अधिकाऱ्यांसोबत एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची सविस्तर चर्चा झाली अशी माहिती सरनाईक यांनी दिली.

## आता पाण्याचाही मिळणार 'सातबारा', देशातील पहिला उपक्रम

**वृत्तसंस्था, मुंबई**

आपल्या गावात जमीन कोणाच्या नावावर आहे आणि ती किती आहे, हे जसे सातबा-यावरून लगेच कळते. तसेच आता गावात पाण्याचा साठा किती आहे आणि त्याचा वापर कसा होतोय, याची नोंद पाण्याच्या सातबाऱ्यावर ठेवली जाणार आहे. राज्यातील पाण्याची उधळपट्टी थांबवण्यासाठी महसूल विभागाने हा मोठा प्लॅन तयार केला आहे. चंद्रशेखर बावनकुळे यांनी ट्वीट करत याबाबतची माहिती दिली आहे. जल सातबारा या अभिनव संकल्पनेला विकसित करण्याची तयारी सरकारकडून करण्यात आली आहे.



महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जाहीर केल्यानुसार, पाण्याचा बेसुमार वापर रोखण्यासाठी आणि वॉटर इकॉनॉमी मजबूत करण्यासाठी महाराष्ट्र सरकार वॉटर अकाऊंटिंग फ्रेमवर्क आणि वॉटर बॅलन्सशीट संकल्पनेवर काम करत आहे. या अंतर्गत पाण्याचे ऑडिट केले जाईल. विकसित महाराष्ट्राच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल असल्याचे बावनकुळे म्हणाले.

गाव व शहरातील पाण्याचा स्त्रोत, पाण्याची उपलब्धता, वापर, गरज लक्षात घेऊन पाण्याचा ताळेबंद तयार करणार असल्याचे समजतेय. शास्त्रीय पद्धती विकसित करून जल सातबाऱ्याची प्रायोगिक तत्त्वावर अंमलबजावणी करण्यात येणार आहे. एक गाव व नगर परिषदेत हा पथदर्शी प्रकल्प राबविला जाणार आहे, अशी माहिती मिळाली.

**देशातील पहिले अभिनव पाऊल : बावनकुळे**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील विकसित महाराष्ट्राच्या वाटचालीतील जल ७/१२ हे देशातील पहिले अभिनव पाऊल ठरेल, असा विश्वास मंत्री बावनकुळे यांनी व्यक्त केला आहे. या उपक्रमात गाव व शहरातील पाण्याचा स्त्रोत, पाण्याची उपलब्धता, वापर, गरज लक्षात घेऊन पाण्याचा ताळेबंद तयार करण्याची शास्त्रीय पद्धती विकसित करून त्याची प्रायोगिक तत्त्वावर अंमलबजावणी करण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील एक गाव व नगर परिषदेत हा पथदर्शी प्रकल्प राबविला जाणार असल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे.

## उद्या साजरी होणार बकरीद

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

भारतासह जगभरात ईद-उल-अजहा म्हणजेच बकरीद सणाची जय्यत तयारी सुरू आहे. यंदा २८ मे रोजी हा पवित्र सण साजरा केला जाणार आहे. सर्वसामान्यपणे लोकांना केवळ मीठी ईद आणि बकरीद या दोनच सणांची माहिती असते, परंतु इस्लाम धर्मात वषार्तून तब्बल तीन प्रकारच्या ईद साज-या केल्या जातात, हे फार कमी जणांना ठाऊक आहे. यंदा २८ मे रोजी देशभरात मुस्लिम बांधव बकरीदचा सण मोठ्या उत्साहात साजरा करणार आहेत.

या सणाच्या निमित्ताने इस्लाममधील एका रंजक तथ्याची चर्चा होत आहे. बहुतांश लोकांना केवळ रमजान ईद आणि बकरीद माहीत असते, मात्र इस्लामिक परंपरेनुसार वर्षात तीन वेगवेगळ्या प्रकारे ईद साजरी करण्याची प्रथा आहे, ज्याचे धार्मिक महत्त्व मोठे आहे.

दैनिक सिंहवाणी वृत्त
'सेवश्री' सकल जणांचा उद्धारू
Mail Id : sinhvanivrutta@gmail.com
Epaper : epaper.sinhvani.com
दिनांक : बुधवार, २७ मे २०२६



# "जेव्हा नेत्याने भविष्य पाहिलं... आणि काळाने ते खरं ठरवलं! नितीन गडकरींच्या दूरदृष्टीचा प्रवास"

लेखक



ॲड. अद्वैत चव्हाण
नागपूर

राजकारणामध्ये अनेक नेते येतात, लोकप्रिय होतात आणि काळाच्या ओघात विस्मृतीतही जातात. काही नेत्यांच्या वाट्याला प्रचंड प्रसिद्धी येते, काहींना मोठी पदे मिळतात, तर काही नेते जनतेच्या मनावर त्यांच्या भाषणामुळे किंवा राजकीय भूमिकेमुळे अधिराज्य गाजवतात. परंतु फारच मोजकी व्यक्तिमत्त्वे अशी असतात ज्यांना केवळ राजकीय नेता म्हणून नाही, तर एक दूरदृष्टी असलेला विचारवंत, विकासाचा शिल्पकार आणि समाजाचा खरा हितचिंतक म्हणून ओळखले जाते. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे असेच एक व्यक्तिमत्त्व आहे.

त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा कार्यप्रवास पाहताना फक्त रस्ते, पूल किंवा महामार्ग यांची चर्चा करून त्यांचं व्यक्तिमत्त्व समजणं अपूर्ण ठरेल. कारण नितीन गडकरी यांचं नेतृत्व हे केवळ पायाभूत सुविधांच्या निर्मितीपुरतं मर्यादित नाही; तर ते विचारांची उभारणी करणारे, लोकांना दिशा देणारे आणि भविष्याचा वेध घेणारे नेतृत्व आहे. माझ्या वैयक्तिक आयुष्यातील एक अनुभव आजही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा वेगळा पैलू दाखवतो.

नेमकं वर्ष आज आठवत नाही, पण काही कामानिमित्त मी वाशीम येथे माज्या नातेवाईकांकडे गेलो होतो. योगायोग असा की त्यांच्या घराशेजारी असलेल्या जिल्हा परिषद मैदानावर त्या दिवशी मोठी गडबड सुरू होती. चौकशी केल्यानंतर समजलं की भारतीय जनता पक्षाचे नेते नितीन गडकरी यांची सभा तिथे आयोजित करण्यात आली होती. तो काळ आजच्यासारखा नव्हता. त्या काळात महाराष्ट्रात काँग्रेस आणि शिवसेनेचा मोठा प्रभाव होता. भाजपला राष्ट्रीय स्तरावर अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली सत्ता मिळाली होती, मात्र महाराष्ट्रात भाजपच्या नेत्यांबद्दल लोकांमध्ये विशेष आकर्षण किंवा प्रचंड जनाधार होता असं म्हणता येणार नव्हतं. भाजपच्या सभांसाठी मोठ्या प्रमाणावर लोकांची गर्दी जमवणं हे तसं कठीण काम होतं. मात्र या सर्व परिस्थितीमध्ये एक गोष्ट नेहमी आश्चर्यचकित करायची, ती म्हणजे नितीन गडकरी यांच्या सभांमध्ये होणारी प्रचंड गर्दी.

त्या काळामध्ये नागपूरमध्ये उभा राहत असलेला "मिहान" प्रकल्प लोकांमध्ये चर्चेचा विषय झाला होता. अनेकांना त्याबद्दल कुतूहल होतं. मिहान म्हणजे काय? त्याचा फायदा कोणाला होणार? रोजगार कसा निर्माण होईल? विदर्भाचं चित्र कसं बदलेल? असे अनेक प्रश्न लोकांच्या मनात होते. याच संदर्भात ती जनजागृती सभा आयोजित करण्यात आली होती.

मी ही वैयक्तिकरित्या ती सभा ऐकण्यासाठी गेलो. आजही मला स्पष्ट आठवतं. ना भव्य



स्टेज, ना अनावश्यक दिखावा, ना बडेजाव. अत्यंत साध्या व्यासपीठावर उभे राहून नितीन गडकरी बोलत होते. परंतु त्यांच्या बोलण्यामध्ये एक वेगळीच ताकद होती.

त्यांच्या भाषणाची शैली थेट लोकांच्या मनाला स्पर्श करणारी होती. ती केवळ राजकीय भाषणं नव्हती; ती एका शिक्षकाची शिकवण वाटत होती, एका मार्गदर्शकाचा सल्ला वाटत होता आणि एका दूरदृष्टी असलेल्या व्यक्तीचा विचार वाटत होता. मला आठवतं, भाषणादरम्यान त्यांनी एका अंदाजे पंधरा-सोळा वर्षांच्या मुलाला स्टेजवर बोलावलं आणि त्याला फ्रेंच भाषेत काही बोलायला सांगितलं. उपस्थित लोक आश्चर्यचकित झाले. नंतर त्यांनी एक अतिशय महत्त्वाचा मुद्दा मांडला.

ते म्हणाले की, विदर्भातील शेतकऱ्यांच्या मुलांनी फक्त पारंपरिक शिक्षणाच्या चौकटीत अडकून राहू नये. डॉक्टर किंवा इंजिनियर होणं हेच यशाचं एकमेव मापदंड नाही. त्यापेक्षा स्वतःमध्ये कौशल्य विकसित करणं, विदेशी भाषा शिकणं, नवीन तंत्रज्ञान आत्मसात करणं आणि जागतिक संधींसाठी स्वतःला तयार करणं अधिक महत्त्वाचं आहे.

त्यांनी स्पष्ट सांगितलं की भविष्यात मिहानसारख्या प्रकल्पांमुळे अनेक जागतिक कंपन्या येतील आणि त्यासाठी केवळ पदवी नाही तर कौशल्य महत्त्वाचं असेल. त्या काळात हे विचार काहीसे वेगळे आणि धाडसी वाटत होते. आज मात्र मागे वळून पाहताना जाणवतं की त्यांनी तेव्हा जे सांगितलं होतं, तेच आज वास्तव बनलं आहे. आज स्किल डेव्हलपमेंट, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, परदेशी भाषा, डिजिटल कौशल्य, कम्युनिकेशन स्किल्स आणि जागतिक रोजगार संधी यांचं महत्त्व सर्वांना पटलेलं आहे. परंतु अनेक वर्षांपूर्वीच एका सभेमध्ये उभं राहून हे चित्र लोकांसमोर उभं करणं, हे केवळ दूरदृष्टी असलेल्या व्यक्तीचं काम असू शकतं.

कदाचित काही नेत्यांना प्रसिद्धी अधिक मिळाली असेल. काहींच्या सभांना मोठा गाजावाजा झाला असेल. काहींच्या नावाभोवती मोठं राजकीय वलय निर्माण झालं असेल. परंतु प्रसिद्धी आणि दूरदृष्टी या दोन वेगळ्या गोष्टी आहेत.

नितीन गडकरी यांच्या बाबतीत एक गोष्ट विशेष जाणवते. त्यांनी स्वतःची ओळख घोषणांनी नव्हे, तर कामातून निर्माण केली. मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग असो, महाराष्ट्रातील उड्डाणपूल प्रकल्प असोत, ग्रामीण भागातील रस्त्यांचं जाळं असो किंवा देशभरातील महामार्ग विकास प्रकल्प असोत. त्यांनी प्रत्येक कामामध्ये परिणामकारकता दाखवली. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील आणखी एक विशेष गुण म्हणजे "अजातशत्रू" वृत्ती. आजच्या राजकारणात कटुता, आरोप-प्रत्यारोप आणि वैयक्तिक टीका यांचं प्रमाण वाढताना दिसतं. अशा वातावरणात विविध पक्षातील अनेक नेते नितीन गडकरी यांच्याबद्दल आदराने बोलताना दिसतात. हे फक्त राजकीय यश नाही; तर ते व्यक्तिमत्त्वाचं यश आहे. कारण शेवटी माणूस मोठा होतो तो फक्त पदामुळे नाही, तर त्याच्या विचारामुळे, वागण्यामुळे आणि लोकांशी जोडल्या गेलेल्या नात्यामुळे.

नितीन गडकरी यांच्या कार्याचा विचार केला की एक गोष्ट स्पष्टपणे जाणवते. त्यांनी विकासाला केवळ घोषणांचा विषय बनवलं नाही; तर लोकांच्या जीवनात बदल घडवण्याचं साधन बनवलं. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा!

त्यांना उत्तम आरोग्य, दीघार्युष्य आणि अशीच अखंड कार्यशक्ती लाभो हीच सदिच्छा. महाराष्ट्राला आणि देशाला विकासाच्या नवीन दिशा दाखवणाऱ्या या नेतृत्वाचा प्रवास असाच निरंतर सुरू राहो आणि त्यांच्या विचारातून नव्या पिढीला प्रेरणा मिळत राहो. हीच वाढदिवसानिमित्त मनापासून प्रार्थना.

**- प्रिंट व डिजीटल मीडिया कायदे सल्लागार, नागपूर**
**९८२२६६८७८६**









दैनिक सिंहवाणी वृत्त

'सेवश्री'
सकल जणांचा उद्धारू



Mail Id : sinhvanivrutta@gmail.com
Epaper : epaper.sinhvani.com
दिनांक : बुधवार, २७ मे २०२६

संपादकीय लेखणीतून...

# तीव्र उष्णतेची लाट

देशाच्या अनेक भागात सध्या उष्णतेची भयानक लाट पसरली असून ही स्थिती २८ मे पर्यंत कायम राहील असा अंदाज आहे. नऊ दिवसांच्या या अत्यंत उष्ण काळाला नौतपा असे संबोधले जात आहे. जैसलमेरमध्ये तापमानाने ४६ अंश सेल्सिअसचा टप्पा ओलांडला आहे. भारतीय हवामान विभागाने पश्चिम राजस्थानमध्ये तीव्र उष्णतेची लाट आणि पूर्व राजस्थानमध्ये ३० मे पर्यंत उष्णतेची लाट राहील असा इशारा दिला आहे. भारतीय हवामान विभागाने पुढील ७ दिवस मध्य आणि वायव्य भारतात तर पुढील ३ ते ५ दिवस पूर्व आणि द्वीपकल्पीय भारतात उष्णतेची लाट कायम राहण्याचा अंदाज वर्तवला आहे. २९ मे नंतर तापमानात काहीशी घट होण्याची शक्यता आहे. सुपर एल निनोच्या प्रभावामुळे हवेतील आर्द्रता कमी होऊन कोरडे हवामान निर्माण झाले आहे. त्यामुळे तापमान ४८-५० अंश सेल्सिअसपर्यंत जाण्याची शक्यता आहे. देशातील अनेक राज्ये ४० अंशापेक्षा जास्त तापमानाचा सामना करत आहेत. पूर्व उत्तर प्रदेश, हरियाणा, चंदिगड, दिल्ली आणि हिमाचल प्रदेश या भागात उष्णतेची लाट आली आहे. मध्य प्रदेशातील छतरपूर, खजुराहो, नौगाव भागात तापमानाने ४७ ते ४८ अंश सेल्सिअसचा आकडा गाठला असून तेथे रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. भीषण उष्णतेमुळे पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी राज्यातील सरकारी कार्यालये आणि सर्व शाळांच्या वेळा बदलल्या आहेत. या संस्था सकाळी ७.३० ते १.३० या वेळेत सुरू राहतील. बऱ्याच ठिकाणी उष्णतेचा कहर सुरू असताना, झारखंडची राजधानी रांचीमध्ये भीषण पाणीटंचाई निर्माण झाली आहे. नागरिक पूर्णपणे महानगरपालिकेच्या टँकरवर अवलंबून आहेत. हे टँकर सर्व भागात पोहोचत नसल्याने रहिवाशांमध्ये तीव्र संताप आहे. महाराष्ट्रात दिवसेंदिवस तापमानाचा पारा वाढत असून यवतमाळ जिल्ह्यात ४८ तासांत आठ जणांचा आकस्मिक मृत्यू झाल्याचे सांगितले जात आहे. हे सर्व मृत्यू उष्माघाताचे बळी असल्याचा अंदाज आहे. संपूर्ण विदर्भात उष्णतेची लाट कायम असून शहराप्रमाणे ग्रामीण भागाला देखील या उष्णतेच्या लाटेचा परिणाम जाणवू लागला आहे. वाढत्या तापमानामुळे ग्रामीण भागात शेतीची कामे खोळंबली आहेत. दुपारच्या वेळी कडक उन्हामुळे मुख्य रस्ते आणि बाजारपेठांमध्ये शुकशुकाट दिसू लागला आहे.

उष्णतेच्या त्रासामुळे शेतमजूरही शेतीतील कामे थांबवून विश्रांती घेण्यास प्राधान्य देत आहेत. या तीव्र उन्हाचा ऊस पिकासह अन्य पिकांच्या वाढीवर विपरीत परिणाम झाला असून, उत्पादनात मोठी घट होण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. पिकांसोबतच जनावरांच्या दूध देण्याच्या क्षमतेवरही परिणाम झाला आहे. सध्याच्या कडक उन्हामुळे नागरिकांमध्ये अशक्तपणा येणे, चिडचिड होणे असे त्रास जाणवत असून उष्माघाताची लक्षणेही दिसून येत आहेत. नागरिकांनी व विशेषतः बालकांनी दुपारी शक्यतो बाहेर पडणे टाळावे आणि सायंकाळीच बाहेर पडावे असे आवाहन डॉक्टरांनी केले आहे. मे महिन्याच्या अखेरपर्यंत उष्णतेची ही लाट अशीच कायम राहण्याची शक्यता हवामानतज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. तीव्र उष्णता जीवघेणी ठरत आहे. या तीव्र उष्णतेच्या वातावरणात हवामान विभागाने काहीसा दिलासा देणारी बातमीही दिली आहे. नैऋत्य मान्सून वेगाने पुढे सरकला असून तो अंदमान समुद्र नैऋत्य आणि आग्नेय अरबी समुद्र तसेच बंगालच्या उपसागराच्या बहुतांश भागामध्ये पोहोचला आहे. साधारणपणे मान्सून १ जून रोजी दाखल होतो, परंतु यावेळी तो नियोजित वेळेच्या आधीच म्हणजे २६ मे पर्यंत केरळमध्ये पोहोचण्याची शक्यता आहे. दरम्यान पुढील चार ते पाच दिवसांत केरळ, लक्षद्वीप, तामिळनाडू आणि ईशान्य भारतात मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. उत्तर प्रदेश आणि हरियाणासह अनेक राज्यांमध्ये कमाल तापमान ४५ ते ४७ अंश सेल्सिअसच्या दरम्यान आहे. त्यामुळे निर्जलीकरण आणि उष्माघाताने ग्रस्त असलेल्या रुग्णांच्या संख्येत झपाट्याने वाढ होत आहे. सर्वांत चिंताजनक आकडेवारी विदर्भातून येत आहे. ब्रह्मपुरीमध्ये ४७.२ अंश कमाल तापमानाची नोंद झाली. हे तापमान देशातील सर्वाधिक आहे. दिल्ली-एनसीआर, उत्तर प्रदेश आणि हरियाणातील अनेक भागांमध्ये तापमान ४५ अंश सेल्सिअसच्या वर गेले आहे. विदर्भात सूर्याचा तीव्र प्रकोप कायम आहे. अकोला, अमरावती आणि वर्धा जिल्ह्यात रेड अलर्ट तर चंद्रपूर, नागपूर आणि यवतमाळ जिल्ह्याला ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. भंडारा, गडचिरोली आणि गोंदिया जिल्ह्याला यलो अलर्ट तर ठाणे, मुंबई, नाशिक, अहिल्यानगर, सांगली, सोलापूर, बीड, नांदेड, लातूर आणि धाराशिव जिल्ह्याला कोणताही विशेष अलर्ट नाही. जगातील ५० उष्ण शहरांची यादी जाहीर करण्यात आली आहे. धक्कादायक बाब म्हणजे ही सर्व शहरे भारतातीलच आहेत.

# माई रमाई : मातृत्वाचे महाकाव्य

काका म्हणाले की मुले तीन दिवसांपासून उपाशी आहेत. वसतिगृहाला अन्नधान्यासाठी मिळणारे अनुदान अजून मिळालेले नाही. हे सांगताना वराळे काकाचा कंठ दाटून आला. तत्क्षणी रमाईने कपाटातील डब्यातील सोन्याच्या बांगड्या वराळे काकांना दिल्या आणि म्हणाल्या, या बांगड्या विका किंवा गहाण ठेवा, पण मुलांच्या जेवणाची त्वरित सोय करा. यावर बाबासाहेब काय म्हणतील याचा त्यांनी क्षणभरही विचार केला नाही. सोन्याच्या मूल्यापेक्षा त्यांच्या मनातील मुलांप्रती करुणा मौल्यवान ठरली. अशिक्षित असूनही बाबासाहेबांच्या कर्तृत्वाला साजेशी व स्वतंत्रपणे निर्णय घेण्याची क्षमता माईंत होती.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब तहानभूक विसरून पुस्तक वाचनात दंग असत. एकदा जेवणाची वेळ झाली असता रमाईंनी त्यांच्यापुढे जेवणाचे ताट ठेवले. साहेबांचे जेवण आटोपले असेल वाटून ताट उचलण्यासाठी त्या खोलीत जरा वेळानेच गेल्या, मात्र ताट तसेच उघडे. न राहून माईंनी त्यातल्या एका पुस्तकाचे पान उघडले आणि म्हणाल्या- या पुस्तकात नवऱ्याने आपल्या बायकोशी कसे वागावे,

**एन. कृष्णकुमार**
**गडचिरोली**

कुटुंबाशी कसे वागावे हे लिहिले असेल तेवढेच मला वाचून दाखवा. डॉ.बाबासाहेब म्हणतात- अगं वेडे, नवऱ्यानं संसार कसा करायचा, हे काही पुस्तकात लिहिलेल नसतं. डॉ. बाबासाहेबांच्या जीवनातील प्रत्येक संकटात रमाई संघर्षरत राहिल्या, हे सर्वश्रुत आहे. त्यांनी आपल्या वैवाहिक जीवनात अत्यंत हालअपेष्टा, दुःख, गरिबी सोसत त्यांवर मात केली. बाबासाहेबांपर्यंत दुःखाची झळ पोहचू दिली नाही. आपल्या संसारात आदर्श पत्नी, सून, माता या भूमिका त्यांनी अपार कष्टाने पार पाडल्या. कधी तक्रार नाही की कुठे त्याची वाच्यता नाही. अथांग दुःखाचे कधी भांडवल केले नाही. घरातील आर्थिक संकटाचा कोणासही थांगपत्ता लागू दिला नाही.

एका मातेसाठी तिचा मुलगा मृत्यू पावणे यासारखे जगात दुसरे दुःख नाही. त्यांचे तर एकापाठोपाठ तीन मुलगे आणि एक मुलगी औषधपाण्याविना तडफडून दगावले. म्हणूनच माईंच्या त्यागाची थोरवी गाताना कवी यशवंत मनोहर म्हणतात- रमाई मातृत्वाचे महाकाव्यच होय, जीवनाचा तो एक संपूर्ण दुःखाशय होता.

माता रमाई भीमराव आंबेडकर या विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पहिल्या पत्नी होत. डॉ.आंबेडकर अनुयायी त्यांना आईची उपमा देत रमाई संबोधतात. माता रमाई आंबेडकर यांचा जन्म दि.७ फेब्रुवारी १८९८ रोजी एका गरीब कुटुंबात झाला होता. त्यांचे वडील भिकूजी धुत्रे- वलंगकर व आई रुक्मिणी यांच्यासह रमाई दाभोळजवळील वणदगावात नदीकाठी महारपुरा वस्तीमध्ये राहत. त्यांना ३ बहिणी व एक भाऊ- शंकर अशी चार भावंडे होती. मोठी बहीण दापोलीत दिली होती. भिकूजी दाभोळ बंदरात माशांनी भरलेल्या टोपल्या बाजारापर्यंत पोहचवत असत. त्यांना छातीचा त्रास होता. रमाई लहान असतानाच त्यांच्या आईचे आजारपणाने निधन झाले.

आईच्या जाण्याने कोवळ्या रमाईच्या मनावर आघात झाला. धाकटी बहीण गौरा व भाऊ शंकर अजाण होते. काही दिवसात वडील भिकूजी यांचेही निधन झाले. पुढे वलंगकर काका व गोविंदपुरकर मामा मुलांना घेऊन मुंबईला भायखळा मार्केटच्या चाळीत रहायला गेले. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन घडविण्यात रमाईंचा सिंहाचा वाटा आहे.

रमाई म्हणजे बाबासाहेबांची सावलीच होती. त्यांनी आपले जीवन बाबासाहेबांच्या कार्यांप्रती समर्पित केले नसते तर बाबासाहेबांना शून्यातून जग निर्माण करता आले नसते, हे नाकारता येत नाही. मुंबईतील भायखळा मार्केटमधील मासळी बाजार येथे बुधवार दि.४ एप्रिल १९०६ रोजी त्यांचे भीमरावांसोबत लग्न झाले. त्यांच्या जीवनाच्या अनेक हृदयदायक घटना सांगता येतील. एका प्रसंगी बाबासाहेबांच्या सत्कार समारंभात माईंना नेसायला लुगडे नव्हते. तेव्हा त्यांनी बाबासाहेबांचा फेटा लुगडे म्हणून घातला. गरिबीची केवढी मोठी शोकांतिका! पण रमाईंच्या त्यागामुळे आज देशातील लाखो महिलांचे जीवनच बदलून गेले आहे. माई संसारात रमल्या, परंतु भीमराव पुस्तकांत रमले.

डॉ.बाबासाहेब व माता रमाई राजगृहात राहत असताना बाबासाहेबांना अचानक विदेशात जावे लागत होते. बाबासाहेबांनी धारवाडच्या वराळे या आपल्या मित्राकडे काही दिवसासाठी माईंना पाठविले. वराळे काका लहान मुलांचे वसतिगृह चालवित होते. त्यांच्या आवारात लहान मुले नेहमी खेळायला येत असत. दोन-चार दिवसांत माईंना त्या लहान मुलांचा लळा लागला. दोन दिवस झाले मुले आवारात दिसली नाहीत, म्हणून माईंनी काकांना विचारले. काका म्हणाले की मुले तीन दिवसांपासून उपाशी आहेत. वसतिगृहाला अन्नधान्यासाठी मिळणारे अनुदान अजून मिळालेले नाही. हे सांगताना वराळे काकाचा कंठ दाटून आला. तत्क्षणी रमाईने कपाटातील डब्यातील सोन्याच्या बांगड्या वराळे काकांना दिल्या आणि म्हणाल्या, या बांगड्या विका किंवा गहाण ठेवा, पण मुलांच्या जेवणाची त्वरित सोय करा. यावर बाबासाहेब काय म्हणतील याचा त्यांनी क्षणभरही विचार केला नाही. सोन्याच्या मूल्यापेक्षा त्यांच्या मनातील मुलांप्रती करुणा मौल्यवान ठरली. अशिक्षित असूनही बाबासाहेबांच्या कर्तृत्वाला साजेशी व स्वतंत्रपणे निर्णय घेण्याची क्षमता माईंत होती. कष्ट, त्याग, संघर्ष, मातृत्व, प्रेम हे सर्व गुण त्यांच्यात असल्यामुळे बाबासाहेबांचे त्यांच्यावर निस्सीम प्रेम होते. माईंच्या त्यागाविषयी डॉ.बाबासाहेब बहिष्कृत भारतमध्ये लिहितात- आपण परदेशी असताना रात्रंदिवस जिने प्रपंचाची काळजी वाहिली व जिला ती अजूनही करावी लागत आहे. मी स्वदेशी परत आल्यावर माज्या विपन्नावस्थेत गवताचे भारे स्वतःच्या डोक्यावर वाहण्यातही जिने मागेपुढे पाहिले नाही, अशा अत्यंत ममताळू, सुशील व पूज्य स्त्रीच्या सहवासात दिवसाच्या चोवीस तासातून अर्धा तासही मला घालविता येत नाही. बाबासाहेबांनी व्यक्त केलेली ही खंत मन हेलावून टाकते. सन १९४०मध्ये लिहिलेला थॉट्स ऑन पाकिस्तान हा ग्रंथ बाबासाहेबांनी माईंना अर्पण केला आहे.

अर्पणपत्रिकेत ते लिहितात- हृदयाचा चांगुलपणा, मनाचा मोठेपणा, चारित्र्याचे शुद्धत्व आणि याशिवाय त्याकाळी कोणी मित्र नसलेल्या दिवसात आमच्या वाट्यास आलेले दारिद्य आणि विवंचना मनोधैर्याने व तत्परतेने सहन करण्याची जिने तयारी दर्शविली त्या रामूबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा ग्रंथ मी तिला अर्पण केला आहे.

- ९४२३७१४८८३

# प्लेऑफमधील चारही संघ योगायोगाच्या चौकटीत

आयपीएल २०२६ हळूहळू अंतिम टप्प्यात येत आहे. प्लेऑफ फेरी २६ मे रोजी सुरू होईल. क्वालिफायर १ मध्ये आरसीबीचा सामना गुजरात टायटन्सशी होईल, तर एलिमिनेटरमध्ये सनरायझर्स हैदराबादचा सामना राजस्थान रॉयल्सशी होईल.

आयपीएल २०२६ च्या प्लेऑफसाठी चार संघ निश्चित झाले आहेत. रॉयल चॅलेंजर्स बंगलोर, गुजरात टायटन्स, सनरायझर्स हैदराबाद आणि राजस्थान रॉयल्स यांनी अंतिम चारमध्ये स्थान मिळवले आहे. तथापि, या चार संघांमध्ये एक साम्य आहे. याला निव्वळ योगायोग म्हणा किंवा काहीही, या चार संघांनी प्रत्येकी फक्त एकदाच आयपीएल जिंकली आहे. सनरायझर्स आणि डेक्कन फ्रँचायझी स्वतंत्र होत्या आणि त्यांचे मालकही वेगवेगळे होते. त्यामुळे, त्यांची विजेतेपदे स्वतंत्रपणे मोजली जातात.

आरसीबी २०२५ मध्ये चॅम्पियन बनली, तर गुजरातने २०२२ मध्ये आपल्या पदार्पणाच्या हंगामात विजेतेपद पटकावले. सनरायझर्सने २०१६ मध्ये

**डॉ. दत्ता विघावे**
**क्रिकेट समिक्षक**

विजेतेपद जिंकले आणि राजस्थानने २००८ मध्ये लीगच्या पदार्पणातच विजेतेपद पटकावले. आता, हे चार संघ त्यांच्या दुसऱ्या विजेतेपदासाठी लढतील. तथापि, रजत पाटीदार वगळता इतर सर्व संघांचे कर्णधार बदलले आहेत. २०२२ मध्ये गुजरातचे कर्णधारपद हार्दिक पांड्याकडे होते, तर २०१६ मध्ये सनरायझर्सचे कर्णधारपद डेव्हिड वॉर्नरकडे होते. २००८ मध्ये राजस्थानचे कर्णधारपद दिग्गज शेन वॉर्नकडे होते. रजतला एक मोठा टप्पा गाठण्याची संधी आहे.

**डेक्कन चार्जर्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात काय फरक आहे?**

डेक्कन चार्जर्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात महत्त्वपूर्ण फरक आहेत. डेक्कन चार्जर्सची मालकी डेक्कन क्रॉनिकल ग्रुपकडे होती, तर सनरायझर्सची मालकी सन टीव्ही नेटवर्ककडे (मारन कुटुंब) आहे. आर्थिक अनियमिततेमुळे बीसीसीआयने डेक्कन चार्जर्स संघ बरखास्त केला. त्यानंतर, २०१३ मध्ये सनरायझर्स हैदराबादची नवीन फ्रँचायझी म्हणून स्थापना झाली. डेक्कन चार्जर्सची थीम नेव्ही ब्लू (बैलाचा लोगो) होती, तर सनरायझर्स हैदराबादची थीम केशरी (गरुडाचा लोगो) आहे. डेक्कन चार्जर्सने २००९ मध्ये (अँडम गिलक्रिस्टच्या नेतृत्वाखाली) विजेतेपद पटकावले, तर सनरायझर्स हैदराबादने २०१६ मध्ये (डेव्हिड वॉर्नरच्या नेतृत्वाखाली) ट्रॉफी जिंकली. आयपीएलच्या रेकॉर्डमध्ये, या दोन संघांच्या धावा, विकेट्स आणि विजय हे वेगवेगळे मानले जातात, एकसारखे नाहीत.

**रॉयल चॅलेंजर्स बंगळूरः सर्वात संतुलित संघ**

बलस्थानेः - फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण या तिन्ही विभागांमध्ये मजबूत. विराट कोहलीची फॉर्मात असलेली आणि सातत्यपूर्ण कामगिरी. फिल सॉल्ट, रजत पाटीदार, व्यंकटेश अय्यर आणि देवदत्त पडिक्कल यांनी महत्त्वाच्या क्षणी धावा केल्या. टिम डेव्हिड आणि कृणाल पांड्या यांनी फिनिशर म्हणून चांगली कामगिरी केली. जोश हेझलवूड आणि भुवनेश्वर कुमार यांनी पॉवरप्ले आणि डेथ ओव्हर्समध्ये प्रभाव पाडला. संपूर्ण हंगामात क्षेत्ररक्षण उत्कृष्ट होते.

कमकुवतपणाः - कोणतीही मोठी उघड कमकुवत बाजू नव्हती, परंतु नॉकआऊट फेरीचा दबाव नेहमीच एक आव्हान असेल.

आयपीएल २०२६ः - प्लेऑफमध्ये पोहोचलेल्या संघांमध्ये एक विलक्षण योगायोग ! या चारही संघांमध्ये एक असे साम्य आहे जे तुम्हाला आश्चर्यचकित करेल.

**सनरायझर्स हैदराबादः सर्वात स्फोटक संघ**

सामर्थ्येः - अभिषेक शर्मा, ईशान किशन आणि हेनरिक क्लासेन यांची आक्रमक फलंदाजी. मोठी धावसंख्या उभारण्याची क्षमता. मागील सामन्यात आरसीबीला पराभूत केले. युवा गोलंदाज शकिब हुसेन आणि आयपीएल २०२६ः प्लेऑफमध्ये पोहोचलेल्या संघांमध्ये एक विलक्षण योगायोग! या चारही संघांमध्ये एक असे साम्य आहे जे तुम्हाला आश्चर्यचकित करेल.

कमकुवत बाजूः - संपूर्ण हंगामात सातत्याचा अभाव होता. मधल्या सलग पराभवांमुळे संघाचा समतोल बिघडला. कागदावर, त्यांना नॉकआऊट फेरीतील सर्वात कमकुवत संघ मानले जाते. ईशान मलिंगा यांची शानदार कामगिरी. कर्णधार पॅट कमिन्सने दुखापतीतून परतल्यानंतर महत्त्वपूर्ण गोलंदाजी केली.

**गुजरात टायटन्सः सातत्य ही संघाची ताकद आहे**

सामर्थ्येः - साई सुदर्शन आणि शुभमन गिल यांची उत्कृष्ट सलामीची कामगिरी. जॉस बटलरनेही अनेक सामना जिंकून देणाऱ्या खेळी केल्या. कागिसो रबाडा आणि मोहम्मद सिराज यांनी दमदार गोलंदाजी केली. राशीद खान फॉर्ममध्ये परतला. प्रसिद्ध कृष्णा आणि जेसन होल्डर यांचे चांगले योगदान. क्षेत्ररक्षणाच्या बाबतीत स्पर्धेतील सर्वोत्तम संघांपैकी एक होता.

कमकुवत बाजूः मधल्या फळीची पूर्णपणे परीक्षा झाली नाही. वरच्या फळीतील फलंदाज लवकर बाद झाल्यास दबाव वाढू शकतो.

**राजस्थान रॉयल्सः दमदार पुनरागमन, पण सर्वात अस्थिर संघ**

सामर्थ्ये : - वैभव सूर्यवंशी आणि यशस्वी जयस्वाल यांनी दमदार सुरुवात करून दिली. रियान परागने आपल्या कर्णधारपदावर विश्वास संपादन केला. ध्रुव जुरेल आणि नांद्रे बर्गर यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. जोफ्रा आर्चर योग्य वेळी फॉर्ममध्ये परतला. एका खराब टप्प्यानंतर संघाने जोरदार पुनरागमन केले आणि प्लेऑफमध्ये आपले स्थान निश्चित केले.

कमकुवतपणाः .संघाचे यश मोठ्या प्रमाणावर आघाडीच्या फळीतील स्फोटक फलंदाजीवर अवलंबून होते. दबावाखाली मधल्या फळीच्या स्थिरतेची पूर्णपणे चाचणी झाली नाही.

क्रिकेट हा निव्वळ मनोरंजनाचा खेळ नसून त्याच्यातील आकडेवारी आणि विविध घटना - प्रसंगाच्या योगायोगासाठी प्रसिद्ध असलेला खेळ आहे. त्यामुळेच त्याचे चाहते मोठ्या संख्येने असून भविष्यातही ते अशाच आनंददायी प्रसंगांची प्रतिक्षा निश्चितच करत असणार.

- ९०९६३७२०८२


# थकवा, केस गळणे, चिडचिड; कारण थायरॉईड तर नाही?



डॉ. अमित श्रवणकर
MBBS, MD (Medicine)
Senior Physician

तुमच्या गळ्यात एक लहान, फुलपाखराच्या आकाराचा अवयव आहे जो तुमच्या शरीराचा 'मास्टर मोटर' (मुख्य इंजिन) म्हणून काम करतो. हा अवयव म्हणजेच तुमची 'थायरॉईड ग्रंथी'. ही ग्रंथी तुमच्या हृदयाचे ठोके ठरवते, तुमची पचनक्रिया नियंत्रित करते आणि शरीराचे तापमान सांभाळते. आज कोट्यवधी लोक सतत येणारा थकवा, अचानक वाढणारे वजन आणि चिडचिड यामुळे त्रस्त आहेत. पण दुर्दैवाची गोष्ट म्हणजे, त्यांचे हे मुख्य इंजिन बिघडले आहे याची त्यांना अजिबात कल्पना नसते.

**थायरॉईडचे प्रामुख्याने दोन प्रकार असतातः**




१. हायपोथायरॉईडीझम (मंदावलेले इंजिन)ः यामध्ये थायरॉईड ग्रंथी गरजेपेक्षा कमी संप्रेरके तयार करते, ज्यामुळे शरीराचा वेग मंदावतो.

लक्षणेः प्रचंड थकवा जाणवणे, अचानक वजन वाढणे, त्वचा कोरडी पडणे, केस मोठ्या प्रमाणात गळणे आणि सतत थंडी वाजणे.

२. हायपरथायरॉईडीझम (अतिवेगवान इंजिन)ः यामध्ये ग्रंथी गरजेपेक्षा जास्त संप्रेरके तयार करते, ज्यामुळे शरीराचा वेग कमालीचा वाढतो.

लक्षणेः हृदयाचे ठोके अचानक वाढणे किंवा अनियंत्रित होणे, जास्त भूक लागूनही वजन झपाट्याने कमी होणे, प्रचंड मानसिक अस्वस्थता आणि जास्त घाम येणे.

**वेळेवर निदान आणि उपचारांचे महत्त्व**

थायरॉईडच्या समस्यांकडे दीर्घकाळ दुर्लक्ष केल्यास शरीराच्या इतर कार्यांवर परिणाम होऊ शकतो. यामध्ये प्रामुख्याने चयापचय क्रिया, हृदयाचे आरोग्य आणि ऊर्जा पातळी यांचा समावेश होतो. योग्य वेळी डॉक्टरांचा सल्ला घेतल्यास या समस्यांचे व्यवस्थापन करणे शक्य असते.

**आरोग्यासाठी काही महत्त्वाच्या टिप्सः**

नियमित तपासणीः रक्तातील संप्रेरकांच्या पातळीवर लक्ष ठेवण्यासाठी नियमितपणे डॉक्टरांनी सुचवलेल्या चाचण्या कराव्यात.

संतुलित आहारः आहारात आयोडीन आणि इतर आवश्यक पोषक घटकांचा समावेश असावा.

तणाव व्यवस्थापनः मानसिक आरोग्य आणि पुरेशी झोप थायरॉईडच्या आरोग्यासाठी पूरक ठरते.

शरीरातील बदलांकडे लक्ष देणे आणि लक्षणे जाणवल्यास तज्ज्ञ डॉक्टरांकडून मार्गदर्शन घेणे हाच उत्तम मार्ग आहे. आरोग्याबाबत कोणतीही शंका असल्यास स्वतःहून औषधोपचार न करता वैद्यकीय सल्ला घेणे आवश्यक आहे.

- ९५०३३२५७४४

